दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2021-2023
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● गुरूवार दि.२८ मार्च २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक १४७ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

## विकास प्रकल्पांच्या नावाखाली लडाखच्या पर्यावरणाशी खेळ?



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

'श्री इडियट्स' हा चित्रपटाचा खरा खुरा हिरो सोनम वांगचुक तब्बल २१ दिवसांपासून उपोषणावर होते. बर्फवृष्टी असो किंवा थंडीचा कडाका कसलीही पर्वा न करता ६ मार्च पासून सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणवादी, इनोव्हेटर आणि शिक्षणसुधारक वांगचुक उपोषणावर होते. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या उपोषणाचे २१-२१ दिवसांचे टप्प्यांची रणनिती त्यांनी आखली आहे. वांगचुक यांनी मांडलेले मुद्दे व त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे लडाखचे सीमावर्ती भागातील स्थान हे अतिशय महत्त्वाचे व संवेदनशील असेच आहे. त्यामुळे लडाखवासींच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे देशासाठी परवडणारे नाही. चीनच्या जवळील असा भूभाग अस्थिर असणे धोकादायक आहे. या सगळ्याच बाबी लक्षात घेऊन केंद्र सरकार त्याबाबत काही पावले तातडीने उचलेल, ही अपेक्षा आहे.

राज्यघटनेतील सहाव्या अनुसूचीनुसार लडाखला अधिकार देण्याची मागणी हा या आंदोलनातील कळीचा मुद्दा आहे. या अनुसूचीनुसार राज्यांतील जिल्ह्यांना काही विशेष अधिकार मिळतात. त्या अधिकारांनुसार स्वायत्त जिल्हा परिषदांची निर्मिती होते. जिल्ह्यांतील जमीन व्यवहार, वनअधिकार, जलअधिकार, शेतीअधिकार, आरोग्यसेवा अधिकार आदी विषय या स्वायत्त जिल्हा परिषदांच्या अखत्यारित येतात. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे, अशा जिल्ह्यांमध्ये उद्योग सुरू करायचे असतील, तर त्यांना स्वायत्त जिल्हा परिषदांची परवानगी घेणे बंधनकारक असते. आत्ताच्या घडीला आसाम, मेघालय, मिझोरम या राज्यांत प्रत्येकी तीन जिल्ह्यांत व त्रिपुरा मध्ये एका जिल्ह्यात अशी रचना अस्तित्वात आहे.

उद्योगांसाठीच्या परवानग्यां संदर्भात सोनन वांगचुक यांनी नोंदवलेले आक्षेप फार गंभीर आहेत. दक्षिण लडाखमधील जमिनी सध्या काही बडे उद्योग समूह खाण उद्योगासाठी बळकावीत आहेत आणि उत्तर लडाखमध्ये चीनचे अतिक्रमण सुरू आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. उद्योगपती ज्या जमिनी बळकावत आहेत, त्या प्रामुख्याने चराऊ कुरणांच्या जमिनी आहेत. त्या नष्ट होऊ लागल्या तर निसर्गाचा समतोल बिघडेल आणि त्याचे दूरगामी असे गंभीर परिणाम होतील, असा मुद्दा वांगचुक मांडत आहेत. त्यासोबतच आंदोलनकर्त्यांची मागणी आहे ती लेह व कारगिल

पान ३ वर...

## कोकणात वणवे रोखण्यासाठी 'बारामती पॅटर्न' राबविणार

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

वनविभागाच्या हद्दीत मानवनिर्मित वणव्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोकणात 'बारामती पॅटर्न' राबविण्यात येणार आहे. बारामतीतील जैवविविधतेला वणव्यांमुळे असलेला धोका लक्षात घेऊन, असे वणवे लावणाऱ्यांविरोधात कायदेशीर फौजदारी करुन दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात येते. अशा प्रकारची कारवाई आता कोकणात वणवे लावणाऱ्यांवर करण्यात येणार आहे.

खरीप हंगामाची प्राथमिक तयारी करताना कोकणात भाजावळ करण्याची पद्धत आहे. शेतात भाजणी करताना ती नियंत्रणात केली जाते. परंतु, वणव्यामुळे जैववविधते बरोबरच जमिनीच्या पोतावरही परिणाम होतो. वणवा लागला की जमिनीवरील गवत जळून जाते. ती जमीन भाजली जाते. पाऊस पडल्यावर त्या जमिनी वरील माती वाहून मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप होते. जमिनीत पाणी मुरण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी आणखी खोल जाते. तसेच वणव्यामुळे स्थानिक जैवविविधताही नष्ट होते. मद्यपान करणारे, सिगारेट फुंकणारे लोक रस्त्याच्या कडेला पेटती काडी वा सिगारेट टाकतात. तीच आग जंगल जळण्यास कारणीभूत ठरते.

'बारामती पॅटर्न' नुसार जर कोणी जंगलाला आग लावण्याचा प्रयत्न केला तर अशा आरोपी विरुद्ध भारतीय वनअधिनियम १९२७ अंतर्गत कारवाई करण्यात येते. अशा गुन्ह्यास दोन वर्षांची शिक्षा व ५ हजार रुपये दंड देखील होऊ शकतो. जर कोणी जंगलास आग लावणाऱ्यांचे नाव व पुरावे वनविभागास दिले तर अशा नाव कळवणाऱ्यास

पान ३ वर...


## थोडक्यात



### शिरोडा येथे ऑलिव्ह रिडले कासवाच्या पिल्लांना जीवदान

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

शिरोडा वेळागर येथील माजी ग्रामपंचायत सदस्य गुणाजी (आजु) अमरे व कासव मित्र आबा चिपकर यांच्या माध्यमातून १०८ कासवाच्या पिल्लांना जीवदान देण्यात आले. यावेळी गौरीज अमरे, मदन अमरे, पास्कोल फर्नांडिस, आनंद अमरे, दीपा अमरे, संतोष भगत, भुषण मांजरेकर, आकाश रेडकर,कोमल भगत, शोजल भगत, प्रज्वल भगत, छकुली भगत, स्वपनेश भगत, सलोनी भगत, साची भगत व विदेशी पर्यटक उपस्थित होते.



### मोती तलावाच्या काठावर आढळले सोन्याचे कानातले

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

येथील मोती तलाव काठावर सावंतवाडी वनविभागाचे वनरक्षक प्रवीण कमळकर यांना सोन्याची रिंग आढळून आली आहे. ती ज्यांची असेल त्यांनी ओळख पटवून घेऊन जावी असे आवाहन वनविभागाचे कर्मचारी महेश गावडे यांनी केले. श्री. कमळकर हे काल रात्री उशिरा मोती तलावाच्या काठावर बसलेले असताना त्यांना ती रिंग आढळून आली.



### कनेडी, शिवडाव, कळसुली, शिरवल, दारिस्ते, हळवल परीसरात बिबट्याचा वावर

**कणकवली । वार्ताहर**

कणकवली तालुक्यातील कनेडी, शिवडाव, कळसुली, शिरवल, दारिस्ते, हळवल गावच्या परिसरात रविवारी रात्री येथून प्रवास करणाऱ्या एका युवकाला रात्री ८ ३० वाजण्याच्या सुमारास प्रवासादरम्यान रस्त्यावर बिबट्या दिसला.त्यामुळे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.या मार्गावर बिबट्याचा वावर वाढला आहे. अनेकदा लक्ष वेधुनही वनविभाग याकडे दुर्लक्ष करत आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आता तरी वन विभागाचे अधिकारी कर्मचारी या मोकाट सुटलेल्या बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी प्रयत्न करणार का ? असा सवाल पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. तसेच जीवितहानी झाल्यास जबाबदार कोण ? असाही सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहे.

## ओटवणेत बागायतीस लागलेल्या आगीत लाखो रुपयाची हानी

**ओटवणे । प्रतिनिधी**



ओटवणे शेरवाळवाडी येथे नारळ बागेत लागलेल्या आगीत लाखो रुपयाचे नुकसान झाले असून ही घटना सकाळी अकराच्या दरम्यान घडली त्यानंतर लगेच सावंतवाडी पोलीस ठाण्यात याची माहिती मिळतात पोलीस हे. कॉ.रामदास जाधव पोलीस हेड कॉन्स्टेबल एम. के .जाधव , पोलीस पाटील लक्ष्मण उर्फ शेखर गावकर घटनास्थळी दाखल होत घटनेची पाहणी केली. सावंतवाडी येथून नगर पालिकेच्या अग्निशमन दलाला बोलवण्यात आले अग्निशमन दलाचे अमोल शितोळे, पांडूरंग कोळा पटे अग्नीशमन सह तत्काळ हजर झाले मात्र बागेपर्यंत जाण्याचा मार्ग नसल्याने त्यांना आगीच्या काही अंतरावरून माघारी परतावे लागले.या आगीत सुमेद गावडे ,मंगेश गावडे यांचे लाखो रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले बागेतील नारळाच्या झाडांना

पान ३ वर...

## कणकवली न.पं. सफाई कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन!

**कणकवली । वार्ताहर**



कणकवली नगरपंचायत मधील सफाई कर्मचाऱ्यांना मागील तीन महिने वेळेवर पगार होत नाही. आज २७ मार्च आली तरी देखील पगार झाला नाही. म्हणून कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले आहे.

आम्ही खायचे काय ? बाहेरून येणाऱ्या कामगारांना जाण्या येण्यासाठी खर्च लागतो तो कसा करायचा ?सण उत्सव तोंडावर आहेत. तरी देखील आमचे पगार झाले नाहीत. घर कसे चालणार ? आमचे असा प्रश्न विचारत कणकवली नगरपंचायत सफाई कर्मचारी गार्डन कर्मचारी व इतर कर्मचारी मिळून ७० कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले आहे. त्यावेळी मुख्याधिकारी विशाल खत्री यांनी तातडीने सर्वांना बोलावले असून कर्मचाऱ्यांची प्रतिनिधी व ठेकेदार यांच्यासोबत चर्चा करत आहेत. पण कामगारांनी आम्हाला पगार मिळाला नाही तर आम्ही काम बंद आंदोलनावर ठाम असल्याचे सांगितले. याआधी कर्मचाऱ्यांनी २६ मार्चपर्यंत आपला पगार व्हावा यासाठी नगरपंचायत ला पत्र दिले होते अन्यथा आपण २७ मार्चला आंदोलन करणार असल्याचे पत्र देखील दिले होते. त्याच अनुषंगाने आज आपण

पान ३ वर...

## लोकसभा निवडणुकीच्या प्रशिक्षणाला प्रारंभ

**मुंबई । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरवात होण्यापूर्वी कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पार पडणार आहे. आज (बुधवारी) ३७८ क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे जिल्हा नियोजन भवनमध्ये प्रशिक्षण पार पडणार आहे. एका क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे आठ ते दहा मतदान केंद्रांची जबाबदारी असते. निवडणूक काळात नेमकी जबाबदारी काय व कामकाजाची पद्धत कशी असणार, यावर त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघा अंतर्गत तीन हजार ६१७ मतदान केंद्रे आहेत. त्यातील एक हजार २४३ केंद्रे शहरी भागात तर दोन हजार ३५६ केंद्रे ग्रामीण भागात आहेत. या केंद्रांची प्रमुख जबाबदारी असलेल्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यानंतर ६ ते ९ एप्रिल या चार दिवसांत शिक्षकांसह एकूण २० हजार कर्मचाऱ्यांचे तालुकानिहाय प्रशिक्षण पार पडेल. त्यांना एकूण तीनवेळा प्रशिक्षण दिले जाणार असून त्याचा दुसरा टप्पा एप्रिलमध्येच पार पडेल. मतदान केंद्रांवरील कार्यपद्धती, मतदान कसे करून घ्यावे, ईव्हीएमची खबरदारी, मतदार यादी व

पान ३ वर...

## अभिनेते निर्माता लवराज कांबळी यांचे निधन



**मालवण । वार्ताहर**

रेवंडी गावचे सुपुत्र आणि मराठी चित्र- नाट्य अभिनेते, निर्माता लवराज गिरीधर कांबळी (वय ६६) यांचे आज सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास मुलुंड येथील निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. मराठी रंगभूमीवर इतिहास निर्माण करणाऱ्या वस्त्रहरण या नाटकात सुरुवातीला प्रॉम्प्टर आणि नंतरच्या काळात गोप्या या दोन्ही भूमिका आपल्या समर्थ अभिनयाने लोकप्रिय करून मालवणी आणि मराठी रसिकांच्या मनात ठसा उमटविणाऱ्या लवराज कांबळी यांच्या निधनामुळे मालवणी

पान ३ वर...

## न.प.कडून कचरा प्रकल्पाच्या कामासाठी आणलेल्या मशीनमुळे रस्ता उखडला..!

**कणकवली । वार्ताहर**



कणकवली न.प.कडून कचरा प्रकल्पाच्या कामासाठी आणलेल्या मशीनमुळे मुंडेडोंगरी ते गार्बेजडेपो प्रकल्पाकडे जाणारा रस्ता उखडला गेला आहे. गतवर्षीच झालेल्या रस्त्याच्या नूतनीकरणात आता हा रस्ता पूर्णता खड्डेमय स्थितीत आहे. या रस्त्यावरून वाहन चालवणे धोकादायक बनले आहे. त्यामुळे सदर रस्त्याची नगरपंचायत प्रशासनाने त्वरित डागडुजी करून निर्धोक बनवावा, अशी मागणी युवासेनेचे जिल्हा प्रमुख सुशांत नाईक यांच्यासह ग्रामस्थांनी केली. मुंडेडोंगरी येथील नगरपंचायतीच्या गार्बेजडेपो प्रकल्पांतर्गत कचऱ्याचे विलगीकरण करण्यासाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत न. पं. ला मशिन प्राप्त झाली आहे. गार्बेज

पान ३ वर...

## विठू महाकाली देवीच्या पालखीचे सोनाळी येथे राजेशाही थाटात स्वागत

**वैभववाडी । प्रतिनिधी**

वैभववाडी तालुक्यातील रावराणे ईनामदार समाजाचे आराध्य दैवत मिळंद ता.राजापूर जिल्हा रत्नागिरी येथील श्री विठू महाकाली देवीच्या पालखीचे मंगळवारी वैभववाडी तालुक्यातील सोनाळी येथे आगमन झाले. याठिकाणी सोनाळी ग्रामस्थ व वैभववाडी तालुक्यातील रावराणे समाजाच्यावतीने भव्य दिव्य राजेशाही थाटात स्वागत करण्यात आले. सोनाळी येथील श्री पावणादेवी व श्री विठू महाकाली देवीच्या पालखीची भेट झाली. हा पालखी सोहळा पहाण्यासाठी तालुक्यातील सर्व जाती धर्मांच्या लोकांनी गर्दी केली होती. पालखी सोहळ्यानिमित्त तालुक्यातील रावराणे समाजातील चाकरमानी व माहेरवाशींनी गावागावात दाखल झाले असून तालुक्यात उत्साही, आनंदी, भक्तीमय वातावरण झाले आहे. गावागागावात पालखीच्या स्वागतासाठी विदयुत रोषणाई, रांगोळी, गुड्या उभारुन देवीचे

पान ३ वर...

## २६ मार्च ते ८ एप्रिल दरम्यान गोवा अनुभवणार शिगमोत्सव महोत्सव २०२४ चा जल्लोष

**पणजी । वार्ताहर**



शिगमोत्सवाचा वार्षिक सोहळा २६ मार्च ते ८ एप्रिल २०२४ दरम्यान होणार आहे. या कालावधीत अनुक्रमे फोंडा, कळंगुट, साखळी, वाळपई, पर्वरी, डिचोली, काणकोण, पेडणे, वास्को, शिरोडा, कुडचडे, केपे, धारबांदोडा, मडगाव, म्हापसा, सांगे आणि कुंकळ्ळी येथे पारंपरिक मिरवणूक होणार आहे. शिगमोत्सव मिरवणूक ज्या ठिकाणी मार्गस्थ होते तेथे उत्सवाशी निगडित आपल्या अनोख्या चालीरीती आणि परंपरा पुढे आणते. राजधानी पणजीमध्ये रोमटामेळ, घोडेमोडणी, धनगर नृत्य, गोफ, मोरुलो या पारंपरिक नृत्यांसह भव्य मिरवणूक होते. प्रकाश आणि ध्वनीचा वापर करत राक्षसांविरूद्ध देवांच्या विजयी लढायांच्या मनोरंजनासह रामायण आणि महाभारतापासून प्रेरित पौराणिक दृश्यांवर आधारित या मिरवणूक सजलेल्या असतात.

शिगमोत्सवात चित्ररथ मिरवणूक एक दृश्य देखावा आहे, ज्यामध्ये सहभागी मोठ्या रंगाचे ध्वज आणि विविध सांस्कृतिक वेशभूषा धारण करून विस्तृत दागिन्यांनी सजलेले असतात. ढोल (गोव्याचे पारंपारिक वाद्य) च्या तालामुळे एक उत्सवी

पान ३ वर...

## जनसेवा प्रतिष्ठानचा जनसेवा मालवणी कवी पुरस्कार डॉ.नामदेव गवळी यांना प्रदान

**सावंतवाडी । प्रतिनिधी**



मालवणी मुलखातील लोकजीवन व लोकसंस्कृती मालवणी भाषेत शब्दबध्द करत खेड्यातील माणूस नोकरी धंदा व शिक्षणासाठी शहरात जाताना आपल्या खेडेगावातील आठवणी स्मरून किती भावूक आयुष्य जगतो त्यांचे अंतर्मुख करणारे दर्शन प्राध्यापक डॉ. नामदेव गवळी यांच्या कवितेतून होते असे प्रतिपादन जनसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजीव लिंगवत यांनी केले.

जनसेवा प्रतिष्ठानचा जनसेवा मालवणी कवी पुरस्कार डा. नामदेव गवळी यांना प्रदान करताना डॉ. संजीव लिंगवत बोलत होते.डॉ नामदेव गवळी यांच्या कारीवडे येथील निवासस्थानी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला लोकमान्य मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे संचालक तसेच बेळगांव नगरपालिका

पान ३ वर...

सिंधुदुर्ग समाचार

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg. samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com**

सिंधुदुर्ग समाचार
।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

# देशातील दोन राज्यात सरकार धोक्यात आहे का?

निवडणुका तोंडावर आहेत आणि त्याच दरम्यान गुजरात लॉबीचे ऑपरेशन लोटस चालू आहे. आजच्या राज्यसभेच्या निवडणुकीमधे ज्या पद्धतीने विरोधी आमदारांची तोडफोड झाली. मग ते पैसे असो, थैली असो, दबाव असो, ईडी असो, ब्लॅकमेल असो, मोठ्या प्रमाणावर तोडफोड झाली. मग लखनौ असो वा हिमाचल प्रदेश, मोठ्या प्रमाणावर विरोधकांचे आमदार फोडले जात आहेत आणि हिमाचल सरकारमधे अशी स्थिती आहे की आगामी काळात सरकार कधीही पडू शकते आणि दुसरीकडे बिहारमध्ये चाणक्यने एक नवीन खेळ सुरू केला आहे. जिथे काँग्रेसचे दोन आमदार फोडले आहेत. आरजेडीचे आमदार फोडले आहेत. मोठी रांग आहे. आणखी काही आमदार फोडण्यासाठी बिहारमध्ये मोठा खेळ खेळला जाणार आहे. नितीश बाबूंना डिस्चार्ज मिळणार का हा प्रश्न आहे?

जिथे नितीश आणि अमित शहा यांच्यातील संबंध फारसे नाहीत. जेडीयू आणि भाजपमध्ये प्रचंड भांडण आहे तिथे काहीही होऊ शकते. जसे काँग्रेसचे दोन आमदार, त्यानंतर आरजेडीचे आमदार आहेत, त्यानंतर आणखी पाच-सहा काँग्रेस आमदार भाजपच्या संपर्कात आहेत. तर बिहारमध्ये काय होणार आहे, हे बघितले तर असे लक्षात येईल की बिहारमध्ये भाजपचे सध्या ७८ आमदार आहेत. जेडीयूकडे ४५ आहेत, भाजपकडे चार अपक्ष आहेत. मग सरकार चांगल्या पद्धतीने चालवणाऱ्या भाजपला कशाची गरज आहे? काँग्रेसची? आता लोक म्हणतात की काँग्रेसच्या १९ आमदारांची त्यांना फाटा फूट हवी आहे. काँग्रेसचे १२ ते १३ आमदार फुटून भाजपमध्ये जाण्याची शक्यता आहे आणि पुढची कारवाई जेडीयूवर असेल. त्यामुळे भाजपला पाटण्यात जेडीयू आणि काँग्रेस फोडून स्वबळावर सरकार बनवायचे आहे का?? हिमाचल प्रदेशातही भाजपला स्वत:चं सरकार बनवायचं आहे का?. आणि ही ऑपरेशन लोटस निवडणुकीच्या काळात चालणार आहे का? पाटण्यापासून शिमल्या पर्यंत जे चित्र समोर येतंय ते विरोधकांसाठीही आव्हानात्मक आहे.

आज राज्यसभा निवडणुकीत कोण जिंकले, कोण हरले, कोण राज्यसभेचे नवे सदस्य झाले, कर्नाटकात काय घडले, किंवा उत्तर प्रदेशात काय घडलं, किंवा हिमाचलमध्ये काय झालं, हे महत्त्वाचं नाहीय. महत्त्वाचं म्हणजे लखनऊमध्ये समाजवादी पक्षाचे आमदार एका रात्रीत अर्धा डझनहून अधिक ज्या पद्धतीने फोडले गेले ते ऑपरेशन लोटस तिकडे चालू आहे का? भविष्यात अखिलेश यादव यांना गुजरात लॉबी मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे का? आणि हिमाचल सरकार बदलू शकतेय का? काँग्रेस सरकारवर संकटाचे ढग आहेत का? चाणक्याची नजर सिमल्यावर आहे का? आणि पाटलीपुत्रातही असाच खेळ होऊ शकतो का? नितीश कुमारांचाही अंत होऊ शकतो का? असा सगळा राजकीय खेळ सुरू आहे का? काय नियोजन सुरू आहे? येत्या पंधरा दिवसांत देशातील राजकारणात खळबळ उडणार आहे. प्रश्न असा आहे की, आचारसंहिता लागू होण्यास आणि निवडणुका जाहीर होण्यास आता अवघे काही दिवस उरले आहेत. ते दिवस बोटावर मोजता येतील इतक्या कमी कालावधीत अमित शाह जे ऑपरेशन लोटस करत आहेत, लखनौचे आमदार फोडा, शिमल्यातले आमदार फोडा, पाटण्यातील आमदार फोडा, हा तोडफोडीचा खेळ आहे, ही तोडफोड का, मोदीजी यावेळी अत्यंत कमकुवत विकेटवर उभे आहेत का?

बिहारमध्ये नितीश कुमार आणि मोदी यांच्यातील संबंध थोडेसे बिघडले आहेत का? नितीश कुमार अमित शहा आणि मोदींवर नाराज आहेत का? नितीश कुमार भाजप सोडू शकतात का? भारतीय जनता पक्षाची पीछेहाट होत आहे का? बिहारमध्ये काँग्रेस सर्वात कमकुवत विकेटवर आहे. काँग्रेसचा विधिमंडळ पक्ष फोडणे सर्वात सोपे आहे. ७८ आमदार भाजपचे आहेत. काँग्रेसच्या १९ पैकी बारातेरा आमदार केव्हाही फुटू शकतात. आज दोन फुटले आणि काँग्रेसचे काही आमदारही त्या फुटलेल्या दोघांपैकी एकाच्या घरी जमले होते. अमित शहांच्या सूचनेवरून दोन आमदार फोडण्यात आले आहेत. भारतीय जनता पक्षाने आपल्या आमदारांची संख्या ९० किंवा ९१ वर नेली आहे. कधीही याची औपचारिक घोषणा होऊ शकते.

आता प्रश्न असा पडतो की जिथे बहुमताचा आकडा २४३ च्या विधानसभेत १२२ वर आहे, जिथे भाजप ९० किंवा ९१ वर पोहोचली आहे त्यानंतर पुढचे टार्गेट काय असेल. तर पुढचे टार्गेट असेल जनता दल युनायटेड. असा अंदाज आता पाटण्यात सुरू झाला आहे. कारण भारतीय जनता पक्षाला पाटण्यात स्वतःचा मुख्यमंत्री हवा आहे आणि स्वतःचा मुख्यमंत्री असण्याची शक्यता संपवण्यासाठी नितीशकुमार यांना विधानसभा उद्ध्वस्त करायची आहे की जेव्हा विधानसभाच रद्द झाली तर या सर्व तोडफोडीला काही अर्थ उरणार नाहीय. नितीश आणि अमित शहा यांच्यातील संघर्ष इतका वाढला आहे की आता अमित शहांना नितीशला संपवायचे आहे. ही लढाई नाही, ही योजना आहे. ही भाजपची योजना आहे. त्यांना प्रत्येक ठिकाणी दोन पक्ष व्यवस्था हवी आहे. उत्तरप्रदेशमध्ये भाजपा विरोधी समाजवादी पार्टी आहे. तिथं भाजपने बसपाला नाहीसे केले आहे. इतर पक्षांचा तिथं सफाया झाला आहे. आता बिहारमध्ये आरजेडीला तोडणं खूप कठीण आहे. कारण आरजेडी कोणत्याही स्तरावर तडजोड करायला तयार नाही. काँग्रेसतर बिहारमधे नाहीच आहे. अशा परिस्थितीत जनता दल युनायटेड नष्ट झाली तर पुढच्या निवडणुका कोणामधे होणार. राजद आणि भाजप यांच्यात. मग भाजप स्वबळावर सत्तेवर येईल. भारतीय जनता पक्ष नुसती रणनीती आखत नाही, फक्त आमदार फोडत नाही, फक्त एजन्सीचा वापर करत नाही. तर भारतीय जनता पक्ष मार्ग अवलंबतो. जो आपल्या काही लोकांना वेगवेगळ्या राजकीय पक्षात ठेवतो. किंवा वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या लोकांना आपल्या पगारावर ठेवतो. ज्याला आपण स्लीपर सेल म्हणू शकतो. हा भाजपचा स्लीपर सेल काँग्रेसमध्ये आहे, हा स्लीपर सेल जनतादल युनायटेडमध्येही हाच स्लीपर सेल आहे. शिवसेनेकडेही हे स्लीपर सेल होते, हेच स्लीपर सेल नितीशला ही माहिती देत राहिले की तुम्ही राजदसोबत गेलात तर तुमचा पराभव होईल. तुम्हाला एकत्र यायचं असेल तर भाजपसोबत यावं लागेल. बिहारचं ऑपरेशन करताना एक गोष्ट समजली की, अमित शहांना आता ऑपरेशन नितीश करून आता नितीशला राजकीयदृष्ट्या संपवायचे आहे.

## २८ मार्च : तिथीनुसार शिवजयंती

# शिवरायांची युद्धनीती

अफाट शौर्य, प्रबळ इच्छाशक्ती आणि आणि प्रचंड आत्मविश्वास यांच्या बळावर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पाच पातशाह्यांना चारी मुंड्या चित करून मूठभर मावळ्यांच्या साथीने अतिविराट हिंदवी स्वराज्य स्थापन करणारे छत्रपती शिवाजी महाराज जगाच्या इतिहासातील एकमेव उदाहरण आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यांच्या पराक्रमाची कीर्ती आज साता समुद्रापार पोहोचली आहे. जगातील नामांकित विद्यापीठांमध्ये त्यांच्या राज्यकारभाराचे धडे गिरवले जात आहेत. शत्रूलाही हेवा वाटावा असे अवतारी व्यक्तिमत्व महाराष्ट्रभूमीला लाभले हे आपणा सर्वांचे अहोभाग्यच आहे.

प्रत्यक्ष औरंगजेबाने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी त्यांच्या मृत्यूनंतर काढलेले हे उद्गार, ''ते एक महान सेनानी होते. त्यांनी आपल्या कल्पकतेने आणि शौर्याने एक नवीन राज्य निर्माण केले. हिंदुस्थानातील प्राचीन राज्यांचे उरलेसुरले अस्तित्व मी माझ्या प्रचंड सेनादलांच्या साहाय्याने गेली १९ वर्षे नष्ट करण्याच्या प्रयत्नात असतांना त्यांचे बळ मात्र वाढतच होते.'' गोव्याचा गव्हर्नर आणि कॅप्टन जनरल अंतोनियो पाइश द सांद याने शिवाजी महाराज आणि मुघल यांच्यातील युद्धाचा एक अहवाल पोर्तुगालच्या सागरोत्तर मंडळाला पाठवला आहे. त्यात तो म्हणतो, शिवाजीराजे यांनी गोव्यापासून दमणपर्यंतच्या आमच्या सीमेला (सरहद्दीला) लागून असलेला प्रदेश घेतला असून सांप्रत ते मुघलांशी युद्धात गुंतलेले आहेत. हा हिंदुस्थानचा नवा योद्धा इतका हुशार आणि लष्करी डावपेचात इतका निष्णात आहे की, तो बचावाचे आणि चढाईचे युद्धही तितक्याच कुशलतेने खेळतो. तो मुघल प्रदेशात घोडदळ पाठवून प्रदेश जाळून बेचिराख करत आहे.

असे विलक्षण काय होते छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये ? सर्वात पहिली गोष्ट, म्हणजे शिवाजी महाराज ज्या प्रदेशात युद्ध खेळले त्या प्रदेशाची त्यांना पूर्ण माहिती होती. या दख्खनमधील डोंगर, नद्या, नाले कसे आहेत, दुर्ग, घाटवाटा कशा आहेत, याचा अभ्यास त्यांनी केला होता. एवढेच नव्हे, तर तेथील प्रदेशाचे नकाशेही त्यांनी काढले होते. माहिती असण्यासाठी आणि माहिती मिळवण्यासाठी अत्यंत सक्षम असे हेरखाते महाराजांकडे होते. विश्वासराव नानाजी दिगे, बहिर्जी नाईक, सुंदरजी प्रभूजी अशी त्यांच्या हेरांची नावे मिळतात. शिवाजी महाराजांचे हेर बिहारमध्ये भेटल्याची नोंद समकालीन इंग्रज प्रवाशांनी केली आहे. ख्रिस्ताब्द १६६४ या वर्षी पहिल्यांदा जेव्हा शिवाजी महाराजांनी सुरत लुटले, तेव्हा त्या शहराची बित्तंबातमी बहिर्जी नाईकने काढून आणली होती. 'सुरत मारिलीयाने अगणित द्रव्य सापडेल', असा सल्लाही त्याने महाराजांना दिला होता. सुरतेत किती पैसा दडलेला आहे, याची माहिती बहिर्जीने आधीच काढून आणली होती. त्यामुळे सुरतेच्या स्वारीत वेळ वाया गेला नाही. तिसरी गोष्ट म्हणजे कोष ! सैन्य राखायचे, म्हणजे संपत्ती हवी. प्रदेश संपादन करणे आणि त्याचे संवर्धन करणे, म्हणजे सैन्य हवे. ते सांभाळायचे म्हणजे द्रव्य हवे.

त्यासाठी सुरतेसारख्या शहरातील गडगंज संपत्तीची लूट केली. चौथाई आणि गावखंडी यांसारखे करही शिवाजी महाराजांनी चालवले होते. गोव्यानजिकच्या बारदेशावर गावखंडी कर लावल्याची कागदपत्रांतून नोंद आहे. शिवाजी महाराजांचे हे 'अर्थ'कारण फारच बलवान होते. शिवाजी महाराजांचे सैन्य चपळ होते. हत्तीसारख्या धीम्यागतीच्या जनावरांस त्यात थारा नव्हता. लुटीसाठी दुघोडी, तिघोडी स्वार असत. लष्कराच्या हालचाली चापल्य आणि वेग यांवर आधारलेल्या होत्या. अकस्मात आक्रमण (हल्ले) हा महाराजांच्या डावपेचांचा गाभाच होता. शाहिस्तेखानावरील विस्मयकारक छापा हा त्या आक्रमणातील कळसच होता. शिवाजी महाराजांच्या या आक्रमणानंतर ३ वर्षे पुण्यात असलेला खान आपली १ लक्षाची फौज घेऊन अवघ्या ३ दिवसांत गाशा गुंडाळून संभाजी नगरला(तत्कालीन औरंगाबादला) चालता झाला.

शिवाजी महाराजांनी या प्रदेशात लढण्यासाठी आपली एक खास शैली शोधून काढली. यालाच 'गनिमी कावा' म्हणतात. ही शिवरायांची स्वराज्याला मिळालेली फार मोठी देणगी आहे. ही कूटयुद्ध किंवा वृकयुद्ध पद्धतीवर आधारलेली होती. 'गनीम' हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ 'लुटारू' असा आहे. लुटारू जसे अकस्मात येतात आणि लूट घेऊन क्षणार्धात पळून जातात, तसेच शिवाजी महाराजही करत असत. डेनिस किन्केडने म्हणूनच महाराजांना 'द ग्रँड रिबेल' असे म्हटले. अकस्मात छापा, तोही आपल्याला सोयीस्कर अशा जागेवर, स्वत:ची कमीतकमी हानी आणि हातात अधिकाधिक लूट किंवा प्रतिपक्षाची साधेल तेवढी अधिक हानी, ही या गनिमी काव्याची तत्त्वे होती. हे तंत्र जरी महाराजांनी जोपासले आणि मोठ्या प्रमाणावर वापरले, तरी त्याचे प्रवर्तक शहाजीराजे होते. मराठी अकलेचा एक अस्सल नमुना महाराजांनी आलमगीराच्या दख्खनच्या सुभेदारास दाखवला.

पुण्यापासून २४ कोसांवर भीमेच्या काठी, बादशहाचा दूधभाऊ बहादूरखान कोकलताश जफरजंग हा किल्ला बांधून रहात होता. त्याच्यापाशी बादशहाला भेट (नजर) करण्यासाठी म्हणून आणलेले २०० अरबी घोडे आणि १ कोटी रुपयांचा खजिना असल्याची बातमी महाराजांना मिळाली. हेरांनी आपले काम व्यवस्थित पूर्ण केले. आता डावपेच, लढाई आणि लूट असा कार्यभाग राहिला होता. महाराजांनी डावपेच आखले. नऊ सहस्रांची फौज घेऊन महाराजांचा सेनाधुरंधर पेडगावच्या दिशेने निघाला. याचे नाव अज्ञात आहे; पण बहुधा हंबीरराव मोहिते असावेत. याने फारच गंमत उडवून दिली. आपल्या फौजेच्या २ टोळ्या केल्या. २ सहस्रांची एक टोळी बहादूरगडावर धावून गेली. काय करावयाचे हे आधीच ठरलेले होते. मराठी फौज छावणीवर चालून येत आहे, असे समजताच बहादूरखानने आपल्या फौजेला सिद्ध होण्याचा हुकूम सोडला. जय्यत तयार झालेली मुघल फौज किल्ल्याबाहेर येऊन मराठ्यांच्या दिशेने निघाली. मुघल फौज येत आहे, हे पाहिल्यावर मराठी तुकडी पळत सुटली. हुलकावण्या मारीत त्या मराठी फौजेने मुघल फौजेला फार दूर नेले. बहादूरखान चिडून मराठी फौजेचा पाठलाग करत राहिला. खान फार दूरवर गेला आहे, याची बातमी हेरांनी आणल्यावर ७ सहस्रांची दुसरी मराठा टोळी बहादूरगडावर चालून आली. तेथे असलेल्या मूठभर मुघलांना ही धडक सोसवलीच नाही. पाचोळा कोठल्या कोठे उडाला आणि मराठ्यांनी मुघली छावणीची मोठी लूट केली. एक कोटीचा खजिना आणि २०० अरबी घोडे अलगद हाती आले. एवढी मिळकत (कमाई) झाल्याकर मराठ्यांनी मुघली छावणी पेटवून दिली. पेडगावची छावणी कापरासारखी जळून खाक झाली. सर्व लूट घेऊन मराठे पसार झाले. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेकाचा पूर्ण खर्च भरून निघाला.

ख्रिस्ताब्द (इ.स.) १६८९ च्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस शिवाजी महाराजांनी मायनाक भंडारी याला अलिबाग नजीकच्या खांदेरी या बेटावर पाठवले. समुद्र उसळलेला असतांनाच मायनाकने खांदेरीकर किल्ला बांधावयास प्रारंभ केला. खांदेरी आणि उंदेरी ही बेटे अष्टगरातील थळ समोर समुद्रात आहेत. मुंबईच्या इंग्रजांनी कॅप्टन विल्यम मिनचिन याला हंटर आणि रिव्हेंज या दोन मोठ्या बोटी अन् गुराबा देऊन मायनाकला हाकलून देण्यास पाठवले. थळ येथील बंदरातून मराठी छोट्या बोटी रसद, सामानसुमान घेऊन बेटावर जात असत. हे साहाय्य बंद पाडण्याचे काम कॅप्टन मिनचिनला दिले होते.

कॅ. अडर्टन, रिचर्ड केग्विन, फ्रान्सिस थॉर्प, वेल्श, ब्रॅडबरी असे नामांकित दर्यावर्दी कॅ. मिनचिनच्या सोबत होते; पण किनार्याकडून समुद्राकडे वहाणारा वारा, भरती-ओहोटीचे कोष्टक, थळपासून खांदेरीपर्यंतचा उथळ किनारा या सगळ्यांची बित्तंबातमी इंग्रजांपेक्षा मराठ्यांना अधिक होती. मोठ्या शिडांच्या इंग्रज बोटी वार्यामुळे खडकावर आदळण्याची शक्यता असल्याने मोठ्या बोटींची उपयुक्तता कमी झाली होती. छोट्या चपळ बोटी मात्र रसद घेऊन रात्रीच्या अंधाराचा लाभ घेऊन बेटावर जात असत. त्याने मुंबईला पाठवलेल्या एका पत्रात लिहिले आहे, 'या छोट्या चपळ मराठी बोटी आम्हाला आश्चर्यकारकरीत्या फसवतात. अशा बोटी इंग्रज आरमारात हव्यात.' काय वाक्य आहे हे ! 'ब्रिटानिया रुल्स द वेव्हज' म्हणणारे इंग्रजी दर्यावर्दी असे म्हणतात, यातच मराठी सागरीसेनेचा विजय आहे. पुढे याच खांदेरीच्या परिसरात मराठी आरमाराचा प्रमुख दौलतखान याने अकस्मात आक्रमण करून 'डव्ह' नावाची एक गुराब पकडली आणि त्यावरील इंग्रजांना सागरगडावर डांबले. या सर्व लढाईत इंग्रजांची मोठी हानी झाली. शिवाजी महाराज आगर्याच्या कैदेत असतांना त्यांच्या भीतीने औरंगजेब आगर्याच्या किल्ल्यातून समोरच असलेल्या जामा मशिदीत नमाज पढावयास जातांना इतका प्रचंड आरक्षक व्यवस्था (बंदोबस्त) ठेवतो, याचे त्या वेळी सर्वांनाच आश्चर्य वाटले होते;

पण शिवाजी महाराजांच्या भीतीपोटी तो असे करत असे, याचा उल्लेख राजस्तानी पत्रात आहे. 'शिवाजी महाराज हे अद्वितीय सेनानी होते. सिंधु नदीपासून बंगालच्या उपसागरापर्यंतचा प्रदेश काबीज करावयाची त्यांची मनीषा होती, असे तत्कालीन फ्रेंच प्रवासी अबेकैरेने लिहिले आहे. शिवाजीराजे हे अजिक्य लढवय्ये होते. राज्यकारभाराची कला त्यांना पूर्ण अवगत होती. ते सुष्टांचे मित्र आणि धर्माचा पुरस्कर्ता होते', असे बर्नियर म्हणतो. रॉबर्ट आर्म याने म्हटले आहे, 'उत्तम सेनापती ला आवश्यक असणारे सर्व गुण शिवाजी राजांमध्ये होते. शत्रूसंबंधी बातम्या मिळवण्यात त्यांनी कोणतीही कसूर केली नाही. मोठी रक्कम ते यासाठी खर्च करत असत. कोणत्याही मोठ्या संकटाचा त्यांनी धैर्याने आणि युक्तीने सामना दिला. त्या काळातील सेनानींत ते सर्वश्रेष्ठ होते. हातात तलवार घेऊन आक्रमण करणारे शिवाजीराजे, ही त्यांच्या सैन्याची प्रेरणा होती. त्यांचे युद्धनेतृत्व, हे त्यांच्या सैन्याचे चैतन्य होते.

**(साभार : हिंदुजागृती डॉट ऑर्ग)**
**संकलन : जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## मंदिर परिसरांत मद्य आणि मांस यांची विक्री नको !

राज्यात अष्टविनायकांसह अनेक पुरातन मंदिरे आहेत, ज्यामध्ये प्रतिदिन भाविकांची रीघ लागलेली असते. अनेक मंदिरांना पर्यटनस्थळांचा दर्जा दिला गेल्याने या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी विविध सुविधा निर्माण केल्या गेल्या आहेत. ज्यामध्ये मद्याची दुकाने आणि बिअर बार्सचाही समावेश आहे. मंदिराजवळ असणाऱ्या हॉटेल्स आणि रेस्टोरंटमधून मांसाहारी भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. काही ठिकाणी मंदिर परिसरात मांसविक्रीची दुकाने थाटली गेल्याचेही निदर्शनास आले आहे. पुरातन जागृत देवस्थाने हा भाविकांचा धार्मिक ठेवा आहे. मंदिरे ही हिंदूंची शक्तिस्थाने असल्याने या ठिकाणी नतमस्तक होऊन तेथील चैतन्य अनुभवण्यासाठी, या चैतन्यक्षेत्रात काही काळ घालवण्यासाठी लांबून लांबून भाविक सह कुटुंब, मित्र मंडळींसह येत असतात. मंदिर परिसरात असलेली मांस विक्रीची दुकाने, मद्याची दुकाने आणि बिअर बार्स मंदिर परिसर अपवित्र करण्याचे काम करतात. मंदिराचे पावित्र्य अबाधित राहावे आणि येणाऱ्या भाविकांना मंदिराचा आणि मंदिर परिसराचा आध्यत्मिक स्तरावर लाभ व्हावा यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन मंडळ, स्थानिक प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी पुढाकार घेऊन मंदिर परिसरातील मद्यविक्रीची आणि मांस विक्रीची दुकाने हटवावीत !

**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## स्वातंत्र्यवीर सावरकर : एक महान युगपुरूष

'तुजसाठी मरण तें जनन, तुजविण जनन ते मरण' हे केवळ कवितेतील पद नसून ती एक अवस्था आहे, तो एक जागृतावस्थेत अनुभव आहे. एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या प्रियकर-प्रेयसीच्या तोंडून 'मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही' यासारखी वाक्ये आपण अनेकदा ऐकली असतील; मात्र मातृभूमीच्या विरहाने अशी व्याकुळता अनुभवणारे स्वातंत्र्यवीर सावरकर हे एकमेवाद्वितियच ! 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट सध्या देशभरात बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालतोय. हा चित्रपट पाहून चित्रपटगृहाबाहेर पडणाऱ्या प्रत्येकाचा ऊर जाज्वल्य देशप्रेमाने भरून आलेला पाहायला मिळत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राने प्रभावित होऊन सावरकरांनी अष्टभुजा देवीपुढे स्वातंत्र्य लढ्यासाठी 'मारिता मारिता मरेन झुंजेन' ही शपथ आपल्या सवंगड्यासोबत घेऊन लहानपणीच राष्ट्रकार्याची सुरुवात केली. तरुणपणी लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली विदेशी कपड्यांची सर्वात मोठी होळी करून आपल्या नेतृत्वाची आणि कर्तुत्वाची झलक त्यांनी दाखवून दिली होती. 'अभिनव भारत' या संघटनेमार्फत त्यांनी अनेक क्रांतिकारकांच्या मनातील स्वातंत्र्य लढ्यासाठी असलेली धग कायम तेवत ठेवली. '१८५७ चा स्वातंत्र्य समर' पुस्तकाने संपूर्ण देशात क्रांतीची ज्योत पेटवून राष्ट्रासाठी प्रसंगी प्राणाचेही बलिदान देण्यास सिद्ध असणारे नवीन क्रांतीकारक त्यांनी निर्माण केले.अंदमान येथील काळ्यापाण्याची पाशवी शिक्षा भोगतानाही त्यांचे मन क्रांतिकार्यापासून किंचितही विचलित झाले नाही. सावरकरांचे पराकोटीचे देशप्रेम, तीव्र इच्छाशक्ती, प्रबळ मनोधैर्य, यांचे दर्शन आजही अंदमान येथील तुरुंगात गेल्यावर होते. जाज्वल्य राष्ट्राभिमानी, अखंड भारताचे पुरस्कर्ते, क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान, लेखक, कवी, वक्ते अशा विविध गुणांनी आणि कौशल्यांनी परिपूर्ण असे व्यक्तिमत्व देशाला लाभले हे आपले भाग्यच म्हणावे लागेल. आयपीएलच्या हंगामात समस्त युवापिढी क्रिकेटचे सामने पाहण्यात गुंतली असताना 'स्वातंत्र्यवीर सावरकर' सारखा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरत आहे हे आजही देशप्रेम जागृत असलेला तरुणवर्ग भारतात शिल्लक असल्याचेच द्योतक आहे.

**श्री.आल्हाद माळगांवकर, पनवेल**

## राज्याची वाटचाल नशेखोरीकडे !

दारूचे व्यसन किती घातक आहे याबाबत आज पहिलीतले पोरही व्यवस्थित माहिती देईल. दारूच्या व्यसनामुळे यकृत खराब होते आणि मनुष्य परलोकवासी होतो. माणसाच्या जाण्याने केवळ त्याचीच नव्हे तर त्याच्यावर अवलंबून असलेल्या समस्त कुटुंबाची वाताहत होते. दारूच्या व्यसनात मनुष्य कर्जबाजारी होतो, हे कर्ज फेडताना कुटुंबच्या कुटुंब दरवर्षी उध्वस्त होत असतात. राज्याला नशामुक्त करण्यासाठी राज्याच्या सामाजिक न्याय विभागाकडून अनुदान तत्वावर राज्य स्तरावर नशाबंदी मंडळ कार्यरत आहे. या मंडळासाठी २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्य सरकारने २० लाखांचा निधी मंजूर केला होतो जो मंडळाला वेळेत मिळालेला नाही. दुसरीकडे २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्य सरकारने केवळ मद्यविक्रीतून २१ हजार ५५० कोटी रुपयांचा महसूल कमावला आहे. मद्यविक्रीला राज्यात मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद लक्षात घेऊन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी राज्य सरकारने २५ हज़ार २०० कोटी रुपये महसूल कमावण्याचे उद्दिष्ट्य ठेवले आहे. मद्यातून मिळणाऱ्या महसुलात आणखी वाढ व्हावी यासाठी उत्पादन शुल्क विभागाकडून साताऱ्यातील पाटण येथे स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र उभारले जाणार आहे. या प्रशिक्षण केंद्रासाठी ३४८ कोटींचा महसूलही संमत करण्यात आला आहे. राज्यात गेल्या २ वर्षांत बिअरची वक्री १० टाक्यांनी वाढली आहे. एकूणच पाहता राज्य सरकारला महाराष्ट राज्य नशामुक्त करण्यात तिळमात्र रुची नसून राज्यातील मद्यविक्री वाढवून राज्याला अधिकाधिक नशेच्या अधीन करून त्यातून महसूल मिळवण्यात सरकार अग्रेसर आहे. दारूमुळे जनतेची होणारी अपरिमित हानी लक्षात घेऊन बिहार, गुजरात, मिझोराम, नागालँड आणि मणिपूर या राज्यांनी आपल्या राज्यांत संपूर्ण दारूबंदी केली आहे. दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराजांच्या, साधू संतांच्या आणि अवतारांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महाराष्ट्राला नशेच्या दरीत ढकलण्याचे काम सरकार करत आहे.


**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## भगव्या ध्वजाला आचारसंहिता कसली ?

इचलकरंजी येथे नागरिकांनी खासगी जागेवर लावलेले भगवे ध्वज आचारसंहितेच्या नावाखाली पालिका प्रशासनाकडून काढले जात असल्याचे वृत्त वाचनात आले. पालिका अधिकाऱ्यांच्या या मनमानी कारभाराची दाखल घेण्याविषयीचे निवेदनही प्रशासनाला देण्यात आले आहे. जानेवारी मासात अयोध्येत श्री राम मंदिराची स्थापना करण्यात आली. त्यानिमित्ताने देशभरातील श्रीरामभक्तानी आपल्या घरांवर भगवे ध्वज लावून दिवाळी साजरी केली. त्यापैकी काहींनी आजही हे ध्वज आपल्या घरांवर कायम ठेवले आहेत. हे ध्वज कोणत्याही राजकीय पक्षाचे नाहीत किंवा त्यावर राजकीय पक्षाचे चिन्हही नाही त्यामुळे हे ध्वज लावल्याने आचारसंहितेचा भंग कसा काय होऊ शकतो ? भगवा ध्वज हा कोणत्याही राजकीय पक्षाची मालमत्ता नसून ते हिंदूंच्या स्वाभिमानाचे प्रतिक आहे त्यामुळे आचारसंहितेच्या नियमात ते बसवणे चुकीचे आहे. शिवसेना पक्षाच्या कार्यक्रमांतून भगवे झेंडे लावण्यात येत असले, तरी अन्य पक्षांच्या झेंड्यांप्रमाणे भगवा ध्वज हा पक्षाचा अधिकृत झेंडा आहे असे शिवसेनेने कधीच म्हटलेले नाही. त्यामुळे भगवा ध्वज हा कोणत्याही राजकीय पक्षाचा झेंडा नसून महाराष्ट्राच्या दैदिप्यमान पराक्रमी इतिहासाच्या आठवणी जागृत करणारी ती विजयी पताका आहे. या भगव्या झेंड्याच्या छत्राखालीच शिवरायांनी मूठभर मावळ्यांना एकत्र करून त्यांची फौज उभारली आणि याच भगव्या झेंडयाखाली शिवरायांनी स्वप्नवत वाटणारे विशाल हिंदवी स्वराज्य उभे केले. हीच भगवी पताका बाजीराव पेशव्यांनी अटकेपार लावली आणि हीच भगवी पताका सदैव डौलाने फडकत राहावी यासाठी मराठा वीरांनी पाच पातशाह्या आणि इंग्रजांशी दोन हात करून अखेरपर्यंत झुंज दिली. अशा या ऐतिहासिक भगव्या ध्वजाला आचारसंहितेच्या चौकटीत बसवणे महाराष्ट्र कसे काय सहन करेल ?

**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## 'मोऱ्या' सुपरहिट




अनेक अडचणींवर मात करीत अत्यंत चतुराईने 'मोऱ्या' हा मराठी भाषेतील चित्रपट २२ मार्च २०२४ रोजी प्रथम प्रदर्शित करण्यात आला. निर्मात्यांची विशेष लक्ष पुरवून चित्रपटाच्या कल्पक वितरणासोबत आधुनिक आणि पारंपरिक पद्धतीची सांगड घालत प्रसिद्धी व मार्केटिंग व्यवस्थापन करून मुंबई, व उपनगर, पुणे आणि धुळे या केंद्रांवर लक्ष केंद्रित करून आपला जम बसवत प्रेक्षकांना चित्रपटगृहाकडे येण्यासाठी आकर्षित केले आहे.

ऐन राजकीय शिमग्याच्या आयपीएल मोसमात 'मोऱ्या' खरोखर प्रेक्षकांसाठी आकर्षण ठरला आहे. विशेष आकर्षण निर्माण करणारे पोस्टर आणि अत्यंत नजाकतीने कापलेला चित्रपटाचा सुबक ट्रेलर, चित्रपटाचे वेगळे कथागुणधर्म, कलाकारांचा नैसर्गिक अभिनय, संगीत आणि सोशल मीडियावरील चर्चा, पोस्ट पाहून प्रेक्षकांची पाऊले आपसूकच चित्रपटगृहाच्या दिशेने वळत असल्याने विशेष आनंद होत असल्याची प्रतिक्रिया मोऱ्याची शीर्षक भूमिका करणारे अभिनेते आणि लेखक दिग्दर्शक जितेंद्र बर्डे यांनी दिली आहे.

मराठी चित्रपटांच्या ट्रेंड पेक्षा वेगळा विषय असलेल्या 'मोऱ्या'ला मिळत असलेला द्विगुणित करणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद आमचा उत्साह वाढवीत असून सर्व टीमने तीन वर्षे घेतलेली मेहनत खऱ्या अर्थाने यशस्वी झाली आहे. येत्या आठवड्यात 'मोऱ्या' महाराष्ट्रातील उर्वरित ठिकाणी आम्ही प्रदर्शित करू, मराठी रसिकांचे प्रेम आम्हाला असेच मिळणार आहे असे 'मोऱ्या'च्या सर्व निर्मात्यांनी म्हटले आहे.

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग)** : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : अँड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, येथे छापून प्रकाशन स्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पाटमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क काऱ्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगर ए ठाणे (वेस्ट)४००६०४

पान १ वरून

## कोकणात वणवे रोखण्यासाठी 'बारामती पॅटर्न' राबविणार

वनविभागाकडून योग्य बक्षीस दिले जाते. आता हाच पॅटर्न कोकणातील जिल्ह्यात राबवण्यात येणार आहे. वणव्यांमुळे सह्याद्रीतील वनसंपदेला धोका₹/ीीपस₹लीगेल्या अनेक वर्षांत कोकणातील सह्याद्रीच्या पट्ट्यात लागणाऱ्या आगीमुळे येथील जैवविविधता धोक्यात आली आहे. अलीकडेच करण्यात आलेल्या₹लीपर्यावरणीय सर्वेक्षणात वणव्यामुळे सह्याद्रीच्या पट्ट्यात असलेल्या वनस्पतीच्या अनेक प्रजाती नष्ट झाल्या आहेत. या वनस्पती आता दुर्मीळ झाल्या असून, त्यामध्ये अनेक उपयुक्त अशा वनस्पतीची निर्मितीही शक्य नाही. त्यामुळे जंगले वाचविण्यासाठी वणवे लावणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे अपेक्षित असल्याचे मत गोसेवा संघ आणि ग्रीम आर्मीचे अध्यक्ष सुशील कदम यांनी व्यक्त केले.

## ओटवणेत बागायतीस लागलेल्या आगीत लाखो रुपयाची हानी

पूर्णतः आगीने वेढा घातल्यामुळे माडांचेही मोठे नुकसान झाले. त्याचबरोबर सुमेध गावडे यांच्या बागायती मधील पाण्याची पाईपलाईन सह पाण्याची मोटर जळाली. अग्निशमन दलाच्या सायरन चा मोठा आवाज यामुळे गावात मोठी दुर्घटना घडली असावी असा अंदाज ग्रामस्थांना आल्यामुळे ग्रामस्थांनी धाव घेतली आणि बागेतील आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला मात्र आगीचे रुद्र रूप पाहता आग नियंत्रणाच्या बाहेर जात होती. काही अंतरावर अग्नीशमन दलाची गाडी होती मात्र रस्ताच नसल्यानें तिथं पर्यंत पोहोचणे शक्य न झाल्याने ग्रामस्थानीच अथक प्रयत्नांनी आग विझविली.भर दुपारी आग लागल्याने त्यावर नियंत्रण मिळविणे कठीण झाले होते.आगीत बऱ्याच अंशी प्रमाणात बागायती मधील लागती माडाची झाडे जळल्याने , पाईप लाईन जळून गेल्याने मोठी हानी झाली.

## कणकवली न.पं. सफाई कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन!

हे आंदोलन करत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. यासंबंधी ठेकेदाराने अधिकारी यांची बदली झाल्यामुळे कागदपत्रांची पूर्तता होऊ शकली नसल्याने पगाराला उशीर झाल्याचे कारण सांगितले. यासंबंधी मुख्याधिकारी, ठेकेदार आणि कर्मचारी यांची कातडीची बैठक मुख्याधिकारी दालनात सुरू असल्याने त्याच्यावर काय तोडगा निघतो हे आता पहावे लागणार आहे.

## लोकसभा निवडणुकीच्या प्रशिक्षणाला प्रारंभ

हाताला शाई लावणे, अशा विविध बाबींवर त्यांना यावेळी मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रशिक्षण सुरु होण्यापूर्वी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपतील, यादृष्टीने मुख्याध्यापकांना नियोजन करावे लागणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता भंगासंदर्भातील तक्रार करण्यासाठी नागरिकांना निवडणूक आयोगाने ल-ोंळसळश्र हे ऑनलाइन संकेतस्थळ उपलब्ध करून दिले आहे. त्याशिवाय १९५० हा टोल फ्री क्रमांक देखील आहे. पण, नागरिकांनी तक्रार करताना त्यांच्या मोबाईलचे लोकेशन ऑन करावे, जेणेकरून जिल्हा प्रशासनाच्या पथकाला त्याचा अचूक शोध घेण्यास मदत होईल. दरम्यान, जिल्ह्यातून आतापर्यंत ४९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यातील ३० तक्रारींमध्ये काहीही तथ्य आढळलेले नाही. १८ तक्रारी निकाली काढल्या असून एका तक्रारीवरील निकाल प्रलंबित आहे. विशेष बाब म्हणजे एकट्या बार्शीतून ३० तक्रारी प्राप्त झाल्या असून माळशिरस, करमाळा, माढा, मोहोळ, शहर मध्य या विधानसभा मतदारसंघातून एकही तक्रार आलेली नाही.

## अभिनेते निर्माता लवराज कांबळी यांचे निधन

नाट्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून नाट्य क्षेत्रातून त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात येत आहे. रेवंडी गावात प्राथमिक शिक्षण तर कांदळगाव ओझरच्या शाळेत माध्यमिक शिक्षण पूर्ण करून लवराज कांबळी यांनी मुंबई गाठली आणि छोटी मोठी नोकरी करताना त्यांनी मालवणी नटसम्राट मच्छिंद्र कांबळी यांच्या भद्रकाली प्रोडक्शनच्या वस्त्रहरण नाटकातून त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पर्दापण केले.

भद्रकाली प्रोडक्शनच्या पांडगो इलो बा इलो, चाकरमानी, करतलो तो भोगतलो, येवा कोकण आपलाच असा या व इतर नाटकांमध्ये लवराज कांबळी यांनी काम केले तर मालवणी नटसम्राट मच्छिंद्र कांबळी यांच्या निधनानंतर गीतांजली प्रोडक्शन ही स्वतःची नाटक कंपनी सुरु केली. गीतांजली प्रोडक्शनद्वारे लवराज कांबळी यांनी 'येवा कोकण आपलाच असा' हे नाटक पुन्हा रंगभूमीवर आणले. गीतांजली प्रोडक्शन मार्फत त्यांनी वडाची साल पिंपळाक, तुका नाय माका, राखणदार, रात्रीचो राजा अशा विविध नाटकांची निर्मिती केली. तसेच लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या सोबत सेम टू सेम या सिनेमामध्येही त्यांनी काम केले होते. लवराज कांबळी हे नेपथ्यकार अंकुश कांबळी यांचे सख्खे जुवळे भाऊ तर रंगभूषाकार तारक कांबळी यांचे ते काका होत. त्यांच्या पश्चात एक मलगाअसा परिवार आहे.

## न.प.कडून कचरा प्रकल्पाच्या कामासाठी आणलेल्या मशीनमुळे रस्ता उखडला..!

प्रकल्पाकडे ही मशिन घेवून जात असताना रस्ता उखडला गेला. परिणामी या रस्त्यावरून वाहन चालवणे धोकादायक बनले आहे. रस्त्यावर खड्डे पडल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. ही बाब ग्रामस्थांनी सुशांत नाईक यांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर सुशांत नाईक यांनी सदर रस्त्याची पाहणी केली. यावेळी युवासेनेचे तालुका समन्वयक तेजस राणे, सोहम वाळके, सचिन आमडोस्कर यांच्यासह येथील ग्रामस्थ उपस्थित होते. सदर रस्त्याची त्वरित डागडुजी करून रस्ता पुन्हा सुस्थितीत करण्यात यावा करण्यात यावा अशी मागणी श्री. नाईक केली आहे.

## जनसेवा प्रतिष्ठानचा जनसेवा मालवणी कवी पुरस्कार डॉ.नामदेव गवळी यांना प्रदान

माजी विरोधी पक्षनेते पंढरी परब, सामाजिक कार्यकर्ते भानुदास पास्ते, अहमदनगर पतपेढीचे संचालक धोंडी राऊळ, किर्तनकार प्रकाश केळुसकर, निवृत्त सैनिक अनंत परब, सुप्रसिद्ध दशावतारी कलावंत मयुर गवळी, स्वंयंपुर्ण शेतकरी वसंत मोरजकर, जनसेवा प्रतिष्ठानच्या सचिव डॉ.सई लिंगवत , सौ. उषा गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ नामदेव गवळी यांनी नवी दिल्ली येथे नुकतच १९० सत्रात सहा दिवस चाललेल्या व गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झालेल्या विश्व बोलीभाषा संमेलनात मालवणी भाषेत कविता सादर करून मालवणी बोलीभाषा पुन्हा एकदा स्वतः समुद्रा पलीकडे नेली. त्यांच्या या योगदानाची दखल घेत जनसेवा प्रतिष्ठानतर्फे त्यांना डॉ. संजीव लिंगवत व पंढरी परब यांच्या हस्ते जनसेवा मालवणी कवी पुरस्कार प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन डॉ नामदेव गवळी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संजीव लिंगवत यांनी डॉ. नामदेव गवळी यांच्या भातालय हा कवितासंग्रहातील काही निवडक मालवणी कविता सादर उपस्थित त्यांना मंत्रमुग्ध केले.

# विकास प्रकल्पांच्या नावाखाली लडाखच्या पर्यावरणाशी खेळ?

**पान १ वरून..**

या दोन जिल्ह्यांसाठी लोकसभेचे दोन स्वतंत्र मतदारसंघ असावेत अशी. लडाखसाठी स्वतंत्र लोकसेवा आयोग स्थापन करावा व त्याद्वारे लडाखमधील सरकारी नोकऱ्यांतील नियुक्त्या कराव्यात, ही मागणीदेखील त्यांनी लावून धरलेली आहे. थोडक्यात सांगायचे तर, जन, जल, जमीन अशा मूलभूत बाबी या आंदोलनाच्या गाभास्थानी आहेत.

केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखला सहाव्या अनुसूचीअंतर्गत राज्याचा दर्जा मिळावा आणि घटनात्मक सुरक्षा प्रदान केली जावी या मागणीसाठी सोनम वांगचुक यांनी उपोषणाचे हत्यार उपसलंय. लडाखसाठी लोकसभेच्या दोन आणि राज्यसभेच्या एका जागेची मागणी त्यांनी केलीय. २१ व्या दिवशी उपोषण सोडताना त्यांनी स्पष्ट केलंय की हा लढा इथेच संपणार नाही, असा इशारा दिलाय. या उपोषणाचा पुढचा टप्पा म्हणजे आजपासून महिलांचा एक गट १० दिवस उपोषणाला बसला आहे. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला देशभरातील लोकांनी पाठिंबा दर्शविला आहे. लडाखचे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी मंगळवारी २१ दिवसानंतर त्यांचं उपोषण सोडलं आहे. २१ दिवस उपोषण केल्यानंतर मंगळवारी वांगचुक यांनी उपोषण सोडताना आपला लढा सुरूच राहणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, 'मी लडाखच्या घटनात्मक रक्षणासाठी आणि लोकांच्या राजकीय हक्कांसाठी लढत राहीन. यानंतर आता महिलांचा एक गट २७ मार्चपासून १० दिवस उपोषण करणार आहे. लडाखचा सहाव्या अनुसूचीत समावेश करून त्याला राज्याचा दर्जा द्यावा आणि इतर मागण्यांसाठी आंदोलन सुरू आहे. या संदर्भात वांगचुक यांनी २१ दिवस उपोषण केले. ६ मार्चपासून सुरू झालेले त्यांचे उपोषण २६ मार्चला संपले. यावेळी त्यांना देशभरातील लोकांचा पाठिंबा मिळाला. मागील २१ दिवसांपासून ते पाणी आणि मीठाचे सेवन करत होते.

वांगचुक प्रत्येकी २१ दिवसांच्या टप्प्याने उपोषण करणार आहेत. त्यांच्या पहिले २१ दिवसीय उपोषण ६ मार्चला सुरूझाले होते. या उपोषणादरम्यान त्यांच्या मागणीला सरकारने कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही. सरकार जोपर्यंत लडाखमधील लोकांच्या मागण्या मान्य करत नाही, तोर्यंत वांगचुक प्रत्येकी २१ दिवसांच्या टप्प्याने उपोषण करणार आहेत.

सोनम वांगचुक यांनी सांगितले की, ६ मार्चपासून लडाखमध्ये सुमारे ६० हजार लोक उपोषणाला बसले होते. मात्र या उपोषणाची सरकारने अद्यापि दखल घेतली नाही. जोपर्यंत सरकर आमच्या मागण्या मान्य करणार नाही, तोपर्यंत लडाखमध्ये हे आंदोलन सुरुच राहिल.

## आजारी रोगयुक्त शेळ्या दोडामार्ग पंचायत समिती समोर बांधण्याचा दिला इशारा

**दोडामार्ग । वार्ताहर**

दोडामार्ग तालुक्यात चांदा ते बांदा विकास योजना अंतर्गत दिलेल्या शेळ्या मृत्यूमुखी शेळ्यांना झालेल्या आजाराची इतर पाठीव शेळ्यांना लागण धनगर समाज संकटात तीन हजार रुपये खरेदी करून आठ हजार रुपये किंमत लावून आजार रोगयुक्त शेळ्या पुरवठा केला संबंधित अधिकारी यांच्या विरोधात संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे यासाठी बुधवारी पुरवलेल्या आजारी रोगयुक्त शेळ्या दोडामार्ग पंचायत समिती समोर बांधण्याचा दिला इशारा. दोडामार्ग तालुक्यातील ३७ लाभार्थी यांनी चांदा ते बांदा विकास योजना अंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन विभाग यांच्याकडे अर्ज केले होते यातील काही लाभार्थी यांना दोडामार्ग पंचायत समिती पशुसंवर्धन विभाग कडून सावंतवाडी येथे एका कार्यक्रमात शेळ्या दिल्या होत्या अवघ्या आठ दिवसात त्या आजारी रोगयुक्त आढळून आल्या दहा शेळ्या एक बकरा असे वितरण काही शेळ्या मृत्यू पावल्या शिवसेना उपजिल्हा प्रमुख बाबुराव धुरी यांनी धनगर



बांधवाच्या गोठ्यात जाऊन मृत्यू झालेल्या आजारी रोगयुक्त शेळ्या केली पाहणी संबंधित अधिकारी यांना धरले धारेवर आजारी रोगयुक्त शेळ्या दोडामार्ग पंचायत समिती कार्यालय येथे बुधवारी बांधण्याचा दिला इशारा संबंधित अधिकारी यांचे धाबे दणाणले या शेळ्या मुळे पाळीव बकऱ्यांना लागण. झाली आहे. संबंधित अधिकारी यांनी तेरा हजार रुपये विम्याची रक्कम भरुन घेतली पण भरपाई दिली जाणार नाही असा पवित्रा घेऊन घेतला आहे. पुरवठा शेळ्या बकऱ्या कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नाही तर लांब कानाच्या बकऱ्या पुरवल्या या इकडे आढळून येत नाही असा आरोप केला आहे. चांदा ते बांदा विकास योजना अंतर्गत पशुसंवर्धन विभाग कडून शेळ्या पुरवठा मध्ये मोठा घोटाळा झाला आहे.

## भारतातील २ कोटींहून अधिक तरुणांचा होणार 'कौशल्य विकास'

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

बजाज ग्रुपतर्फे समाजोपयोगी उपक्रमांसाठी पुढील पाच वर्षांत रु.५,००० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'बजाज बियाँड' या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) आणि धर्मादाय कार्यक्रमांसाठी सुरू करण्यात आलेल्या ग्रुपच्या नव्या विभागांतर्गत कौशल्य विकासावर पूर्ण लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. यामुळे येत्या काळातील २ कोटींहून अधिक तरुणांचा फायदा होणार आहे आणि भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेमुळे उपलब्ध होणाऱ्या रोजगार व उद्योग संधींचा लाभ घेण्यासाठी त्यांना सक्षम करण्यात येणार आहे.

या उपक्रमांवर प्रतिक्रिया देताना बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर बजाज म्हणाले, आमच्या उपक्रमांच्या माध्यमातून भारतातील तरुणांच्या सक्षमीकरणामध्ये परिवर्तनात्मक प्रभाव दिसून आला आहे. आज आम्ही 'बजाज बियाँड'चे अनावरण करत




आहोत. भविष्यातील पिढीला यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांनी सुसज्ज करण्याचे आमचे मिशन आम्ही या माध्यमातून सुरू ठेवणार आहोत. या पुढाकाराबद्दल बजाज ऑटो लि.चे चेअरमन नीरज बजाज म्हणाले, बजाजच्या वारशाचे पाइक म्हणून समाजाची परतफेड करण्याच्या जबाबदारीची आम्हाला जाणीव आहे.

बजाज समुहाच्या उद्योगांमध्ये आणि त्यांच्या समाजसेवी प्रयत्नांमध्ये पिढ्यानपिढ्या सामाजिक जबाबदारीचे भान रुजलेले आहे. गेल्या फक्त १० वर्षांच्या कालावधीत, बजाज ग्रुपने सीएसआर उपक्रमांसाठी सुमारे रु.४,००० कोटींचे योगदान दिले आहे. या बहुतेक उपक्रमांचा भर कौशल्य व शिक्षण, आरोग्य, उपजीविका, जलसंवर्धन आणि विकासाच्या इतर क्षेत्रांवर होता.

बजाज ग्रुपतर्फे विविध संस्थांच्या माध्यमातून मानवतावादी उपक्रम राबविण्यात येतात. यात जमनालाल बजाज फाउंडेशन, जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्था, कमलनयन बजाज हॉस्पिटल इत्यादी संस्थांचा समावेश आहे. या संस्था समुदायांच्या उन्नतीसाठी आणि सक्षमीकरणासाठी अविरतपणे काम करत आहेत. बजाज इंजिनीअरिंग स्कील्स ट्रेनिंग, (बीईएसटी), बजाज फिनसर्व्ह लिमिटेडच्या बँकिंग, फायनान्स व इन्श्युरन्स, बजाज जलसंधारण प्रकल्प, 'हमारा सप्ना' हा जमनालाल बजाज ट्रस्ट चा उपक्रम असे बजाज ग्रुपचे विविध प्रमुख सीएसआर उपक्रम आहे.

## लोकसभा निवडणुकिच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाची आज पुण्यात राज्यस्तरीय बैठक

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकिच्या प्रार्श्वभुमीवर रिपब्लिकन पक्षाची महत्वपूर्ण राज्यस्तरीय बैठक येत्या गुरुवारी दि.२८ मार्च २०२४ रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथील द लेडीज क्लब,तारापोरे रोड,दस्तुर शाळे जवळ; कॅम्प पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे.

रिपब्लिकन पक्षाच्या या महत्वपुर्ण बैठकीस रिपाइंचे राज्यातील केंद्रिय पदाधिकारी आणि राज्यकार्यकारिणीचे प्रमूख पदाधिकारी या बैठकीस उपस्थित राहणार आहेत.या बैठकीत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष

केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.लोकसभा निवडणुकिच्या पार्श्वभुमीवर रिपब्लिकन पक्षाने आयोजित केलेल्या या राज्यस्तरीय बैठकीकडे सर्व राजकीय धुरीणांचे, राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. या महत्वपूर्ण बैठकीत रिपाइं (आठवले) कोणता निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असून राज्यात महायुतीचा घटक पक्ष असताना ही रिपब्लिकन पक्षाकडे जागावाटपात महायतीकडुन दुर्लक्ष झालेले आहे. त्यात भर म्हणुन रिपब्लिकन पक्षाने केलेल्या विरोधाला न जुमानता भाजप ने मनसे ला सोबत घेण्याचा आटापिटा केला आहे.यामुळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांच्या जखमी मनावर मीठ चोळण्याचा जुलुम भाजप करित आहे. या बीकट परिस्थित राज्यभरात अनेक जिल्हात रिपब्लिकन कार्यकर्त्यानी आपल्या तीव्र भावना समाज माध्यमांवर व्यक्त केल्या आहेत.

## २६ मार्च ते ८ एप्रिल दरम्यान गोवा अनुभवणार शिगमोत्सव महोत्सव २०२४ चा जल्लोष

**पान १ वरून..**

वातावरण निर्माण होते, उत्साह आणि आनंदाची भावना निर्माण होते. शिगमोत्सवाचा प्रत्येक घटक गोव्याच्या जीवनाची आणि परंपरांची झलक देतो. पर्यटकांना स्थानिक लोकांशी संवाद साधण्यास, समृद्ध सांस्कृतिक उत्सवांचे साक्षीदार होण्यास तसेच आणि गोव्याबद्दल त्यांचे ज्ञान वाढण्यास मदत होते. ज्यामुळे प्रत्येक सहल खरोखर समृद्ध करणारा अनुभव बनते. शिगमोत्सव मिरवणुकीचे वेळापत्रक खालील प्रमाणे: फोंडा - २६ मार्च, कळंगुट - २७ मार्च, साखळी - २८ मार्च डिचोली - २९ मार्च, पणजी - ३० मार्च, पर्वरी - ३१ मार्च २०२४ पेडणे - १ एप्रिल, काणकोण - २ एप्रिल, वास्को - ३ एप्रिल, शिरोडा / कुडचडे - ४ एप्रिल, केपे / धारबांदोडा - ५ एप्रिल, मडगाव

घरकामासाठी गरजू बाई किंवा मुलगी हवी आहे.
संपर्क- म्हापसेकर नगर पिंगुळी कुडाळ
८००७२७३७५२
९९६०३१७२२३

# विठू महाकाली देवीच्या पालखीचे सोनाळी येथे राजेशाही थाटात स्वागत

**पान १ वरून..**

स्वागत करण्यात येत आहे. पुढचे पाच दिवस पालखीचा मुक्काम वैभववाडी तालुक्यात असणार आहे. यावर्षी तब्बल बारा वर्षांनी देवीची पालखी वैभववाडी तालुक्यात आली आहे. विठु महाकाली देवीच्या पालखी सोहळ्याची परंपरा ही सुमारे २०० वर्षापासून आहे. वैभववाडी तालुक्यातील रावराणे समाजाच्या बारा इनाम गावात पालखीचे आगमन होणार आहे. गेले काही दिवस आतुरतेने वाट पहात असलेल्या प्रथा परंपरेप्रमाणे मिळंद येथुन मंगळवारी सकाळी १०.३० वा. पालखीचे लवाजम्यसह सोनाळी येथे ढोल ताशाच्या गजरात आगमन झाले. सोनाळी गावचे ग्रामदैवत श्री पावणादेवी व श्री विठू महाकाली देवीच्या पालखीची भक्तीमय वातावरणात भेट झाली. हा सोहळा पहाण्यासाठी सोनाळी



ग्रामस्थ, संपूर्ण तालुक्यातील रावराणे समाजाने हजारोंच्या संख्येने गर्दी केली होती. सोनाळी येथील धार्मिक कार्यक्रम आटपून पालखीने एडगावकडे प्रस्थान केले.

एडगाव फौजदारवाडी व इनामदारवाडी येथेही आकर्षक रांगोळ्या, पताका व गुड्या उभारुन पालखीचे भक्तीभावाने स्वागत करण्यात आले. तर एडगाव होळीच्या मांडावर श्री रामेश्वर पालखी व विठू महाकाली देवीच्या पालखीची भेट झाली. त्यानंतर रामेश्वरवाडी येथे महाप्रसाद झाला. दुपारनंतर तिथून एडगांव वांयबोशी येथून जुन्या पायवाटेने पालखी सांगुळवाडी महापूरुष येथे पोहचली. तर सांगुळवाडी होळीच्या मांडावर भगवती देवी व विठू महाकाली देवीच्या पालखीच्या भेटीचा सोहळा पार पडला. त्यानंतर रावराणे समाजाचे श्रध्दास्थान जगदोजी रावराणे किर्ती मंदिर येथे देवीच्या पालखीने भेट दिली. सायंकाळी पालखी नावळे येथील थोरले घराकडे प्रस्थान केले. त्याठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले. तर याठिकाणी ओटी भरणे, रात्रीचा महाप्रसाद व रात्रीचा मुक्काम असा कार्यक्रम होणार आहे.

तर दिनांक २७ मार्च रोजी सांगुळवाडी व निमअरुळे बोर्चादेवी होळीचा मांड येथे देवीची पालखी भेट देणार आहे. तर सांगुळवाडी येथे रात्रीचा मुक्काम होणार आहे . तर दिनांक २८ मार्च रोजी एडगांव येथे रुढी परंपरे प्रमाणे रावराणे समाजाच्या भैरी भवानी मंदिरास भेट देऊन एडगांव येथे मुक्काम होणार आहे. त्याचप्रमाणे दिनांक २९ रोजी सोनाळी होळीचा मांड व पूर्व परंपरे प्रमाणे भेट देणार आहे. त्यानंतर यावर्षी पासून प्रथमच अरुळे, सडुरे,लारे, आचिर्णे या गावांतुन पालखीचे आगमन होणार असून आचिर्णे येथे मुक्काम होणार असून दिनांक ३० मार्च रोजी वाभवे होळीचा मांड येथे भेट देऊन पालखीचे मिळंदकडे प्रस्थान होईल.

## थोडक्यात

### हुंबरठ येथे स्पीकरच्या वायरचा शॉक लागल्याने युवकाचा मृत्यू

**कणकवली । वार्ताहर**

धुलीवंदन करून झाल्यावर स्पीकरच्या वायरचा शॉक लागल्याने हुंबरठ दळवीवाडी येथील सेंट्रींग कामगार रोहितकुमार भुट्टीप्रसाद (३०, मूळ रा. बिहार) याचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबतची खबर अनिल बिजली प्रसाद याने कणकवली पोलीस ठाण्यात दिली आहे. रोहितकुमार भुट्टीप्रसाद हुंबरठ येथे सेंट्रींगचे काम करत होता. सोमवारी धुलीवंदन निमित्ताने कामगारांनी स्पीकर बॉक्स लावले होते. दिवसभर नाचून, रंगपंचमी खेळून झाल्यावर रात्री जेवण करून झाल्यावर झोपायला जात असताना स्पीकर काढले नाही आहेत हे त्या कामगारांच्या लक्षात आले. ते स्पीकर काढण्यासाठी रोहितकुमार भुट्टीप्रसाद हा काढण्यासाठी गेला असता मेन स्वीच बंद न केल्याने त्याला शॉक लागला. तेथील कामगारांनी रोहित कुमार भुट्टीप्रसाद याला कणकवली उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मयत घोषित केले.

### विषारी औषध घेतलेला एकजण रुग्णालयात

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील झरेवाडी येथे अज्ञात कारणातून विषारी औषध प्राशन केलेल्या एकाला उपचारांसाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना मंगळवार, २६ मार्च रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली. अनिल लक्ष्मण गोताड (५६, रा.झरेवाडी, रत्नागिरी) असे विषारी औषध प्राशन केलेल्या प्रौढाचे नाव आहे.

### दारू जप्त

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

बोरघर , खेड ब्राम्हणवाडी पाठिमागील बाजूस पोलिसांनी टाकलेल्या धाडीत २,१३० रुपये किंमतीची देशी - विदेशी व गावठी दारू जप्त केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई २५ मार्च रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अविनाश नारायण चव्हाण, वय ५२, रा.बोरघर, ब्राम्हणवाडी, ता. खेड असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. देशी-विदेशी व गावठी - हातभट्टीची दारु लोकांना विक्री करण्यासाठी ताब्यात बाळगलेल्या स्थितीत तो रंगेहाथ मिळून आला.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, गाव मौजे कणकवली, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथील नगर भूमापन क्रमांक ३५०७ व नगरभूमापन क्रमांक ३५०८ आणि सदर मिळकतीवर उभ्या असलेल्या इमारतीमधील पहिल्या मजल्यातील सदनिका ज्याचा कणकवली नगरपंचायत वॉर्ड क्र. ५, घर नं. १८०क व दुसऱ्या मजल्यातील सदनिका ज्याचा कणकवली नगरपंचायत वॉर्ड नं. ५, घर नं. १८०क(२) ही मिळकत श्री.आनंद विष्णू पारकर व श्री. प्रथमेश आनंद पारकर यांचे मालकी वहिवाटीची मिळकत असून ती आमचे अशिल वर नमूद मालक यांचेकडून खरेदी करणार आहेत. सदरची मिळकत श्री.आनंद विष्णू पारकर व श्री.प्रथमेश आनंद पारकर यांची मालकी वहिवाटीची निर्वेध मिळकत आहे, अशी त्यांनी पुर्ण खात्री व भरवसा आमचे अशिलांना दिल्याने आमच्या अशिलांनी ती खरेदी करावयाचे ठरविले आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही विक्री, हस्तांतर, तबदील, अदलाबदल, अग्रहक्क, करारनामा, विकसनकरार, गहाण, साठेकरार, पोट साठेकरार, लिज, चार्ज, न्यास, दान, पोटगी अन्न, वस्त्र, वहिवाट, बक्षिस, वारसा हक्क, लिज पेन्डस, ताबे हक्क, खरेदी, तारण, इजमेंट किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेचा बोजा, कसलाही व कोणताही हक्कसंबंध किंवा हितसंबध असल्यास तो योग्य त्या कागदपत्रांसह खालील पत्त्यावर सात दिवसांचे आत कळविण्यात यावा. तशा प्रकारे कोणाची कसलीही हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीचा आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी, म्हणून दिली जाहीर नोटीस.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

तारीख : २७/०३/२०२४

सही/-
ॲड. उमेश सुरेश सावंत
ॲडव्होकेट व नोटरी
अंबा निवास, बी.के.जी.रोड
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग.
मोबाईल नं. ९४२३८७९४१२

## थोडक्यात



### आंबोलीत छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिष्ठापना

**आंबोली । वार्ताहर**

राजे प्रतिष्ठान तर्फे कामतवाडी येथे सिंहासनाधीश छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती प्रतिष्ठापना कार्यक्रम उत्साहात करण्यात आला. रायगडाप्रमाणे याठिकाणी प्रतिकृती स्थापन करण्यात आली आहे. आंबोली कामतवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे राजे प्रतिष्ठान तर्फे शिवजयंती उत्सव तिथीनुसार करण्यात येतो.आज या ठिकाणी सिंहासनाधीश मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना विधिवत करण्यात आली.यावेळी माजी पंचायत समिती सदस्य संदीप गावडे, राजे प्रतिष्ठान अध्यक्ष उल्हास गावडे, प्रमुख गावकर श्रीकांत गावडे, शशीकांत गावडे,वसंत गावडे, प्रकाश(बाळा) गावडे, साबा गावडे, केंद्रप्रमुख रामा गावडे, बबन गावडे, काशीराम गावडे, ग्रामपंचायत सदस्य शंकर चव्हाण, तानाजी गावडे, राजे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य, महिला, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुवासींनी प्रत्येक घरातून कलश याठिकाणी आणले होते. उद्या या ठिकाणी शिवजयंती साजरी करण्यात येणार आहे.

### शिवसेना कणकवलीच्या वतीने शिवजयंती (तिथीप्रमाणे) उत्सव

**कणकवली । वार्ताहर**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कणकवलीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे उद्या गुरुवार दि २८ मार्च २०२४ रोजी सकाळी ११ वाजता कणकवली शहर कार्यालयात (प्रांत ऑफिस समोर) शिवजयंती (तिथीप्रमाणे) उत्सव साजरा करण्यात येणार आहे.त्यानिमित्त श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी आमदार वैभव नाईक, जिल्हाप्रमुख संदेश पारकर, कणकवली विधानसभा प्रमुख सतीश सावंत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी यावेळी कणकवलीतील सर्व शिवसेना, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी, आजी माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिक यांनी उपस्थित रहावे असे आवाहन कणकवली तालुका प्रमुख कन्हैया पारकर, तालुकाप्रमुख प्रथमेश सावंत, तालुका संघटक राजू राठोड, महिला जिल्हाप्रमुख नीलम पालव, शहरप्रमुख रुपेश नार्वेकर यांनी केले आहे.

### सहकारी कारखाना मालमत्तेवर प्रतिबंधात्मक कारवाई

**ओरोस । प्रतिनिधी**

सह्याद्री काजू प्रक्रिया व मद्यार्क निर्मिती सहकारी कारखाना मर्यादित सिंधुदुर्ग पडवे, माजगाव तालुका-दोडामार्ग या कारखान्याला सिंधुदुर्ग जिल्हा बँकेने काजू बी खरेदी व प्रक्रियेसाठी रु. एक कोटी एवढे कर्ज दिले होते सदरचे कर्ज थकीत झाल्याने बँकेने संस्थेवर महाराष्ट्र सहकार कायदा कलम ९१ नुसार दि.२८/१२/२०२३ रोजी सहकार न्यायालय क्रं. २ कोल्हापूर येथे बँक कर्ज वसुलीसाठी दावा दाखल केला होता.

### दोडामार्ग बाजारपेठेत दागिन्यांची पर्स चोरीस

**दोडामार्ग । वार्ताहर**

दोडामार्ग शहरात रविवारी आठवडा बाजारात पुणे येथून मांगेली गावी आलेल्या महिलेची दोडामार्ग बाजारपेठेत सामान खरेदी करण्यासाठी गेल्या असता गाडीत ठेवलेली दागिन्यांची पर्स चोरून नेली. पर्समध्ये सुमारे पाऊणे तीन लाखांचे दागिने होते. हा प्रकार शहरातील जान्हवी बेबी केअरच्या समोर घडला. दरम्यान त्याठिकाणी असलेल्या एका दुकानातील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून चोरीचा छडा लावण्याचा दोडामार्ग पोलिसांनी प्रयत्न केला, परंतु त्यात यश आले नाही. दिवसाढवळ्या झालेल्या या चोरीमुळे खळबळ उडाली आहे. अज्ञात चोरट्या विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# कुणकेरी हुडाउत्सव ३० मार्चला



कोकणात प्रसिद्ध असलेला सावंतवाडी तालुक्यातील कुणकेरी गावचा हुडोत्सव येत्या दि.३० मार्चला संपन्न होत असून २९ मार्च पासून या उत्सवाला सुरुवात होणार आहे. १०० फुटी हुड्यावर चढणाऱ्या संचारित अवसरांच्या झटपट चढण्याचा थरार भक्ती आणि भक्तीचा अनोखा संगम पाहण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी कुणकेरी गावात होणार आहे. २९ मार्चला दुपारी २ वाजता गाव रोंबाट सुटणार असून त्यानंतर सायंकाळी ६ वाजता हुड्याजवळ सामुदायिक नारळ फोडण्यात येणार आहेत. रात्री ९ वाजता घुमट वादनासह हुडा आणि होळीवर धूळ मारण्यात येणार आहे. रात्री १० वाजता गाव रोंबाट आणि रात्री ११ वाजता हुडा आणि होळीवर पेटत्या शेणी फेकून ढोल ताश्यासह भाभीचे रोंबाट आणून नंतर कवळे व पेटत्या मशाली घेऊन हुडा आणि होळीभोवती फिरण्याचा कार्यक्रम होणार आहे. ३० मार्चला हुडोत्सवाचा मुख्य दिवस असून या दिवशी सकाळपासून भावई देवीच्या निवासस्थानी तसेच मंदिरात देवीची ओटी भरणे, नवस फेडणे आदी कार्यक्रम होणार आहेत. दुपारी २ वाजता मांडावरून गाव रोंबाट सुटणार असून याचवेळी पळसदळा येथे आंबेगावच्या श्री देव क्षेत्रपाल निशाणाची भेट होणार आहे.

त्यानंतर कोलगाव सीमेवर कलेश्वर देवस्थानची निशाण भेट होऊन सर्वजण भावई मंदिराकडे येणार आहेत. सायंकाळी ४ वाजता हुड्याजवळ घोडे मोडणी व लुटुपुटूचा खेळ होणार असून सायंकाळी ५ वाजता हुड्यावर चढलेल्या अवसारांवर दगड मारण्याच्या पारंपरिक कार्यक्रमाने हुडोत्सवाची सांगता होणार आहे. कुणकेरी येथील श्री देवी भावईचा हुडा उत्सव सर्वदूर प्रसिद्ध आहे. शिमगोत्सवाच्या सातव्या दिनी हा उत्सव होतो. त्यामुळे हजारो लोक खास उपस्थिती दर्शवितात. सागवानी लाकडाची शंभर फुटी उंच होळी उभारली जाते. तिला सजविले जाते, त्यावर अवसारी देव चढण्यासाठी विशिष्ट प्रकारची सोय असते. त्याला हुडा संबोधले जाते.

शिमगोत्सव काळाच्या सातव्या दिवशी हुडा उत्सव असतो. शिवाय घोडे मोडणी, हुडा उत्सव सोबतच रोंबाट, कवळे जाळणे अशा विविध कार्यक्रमांनी शिमगोत्सव साजरा होतो. होळीच्या चौथ्या दिवशी चव्हाटय़ावर हळदीचा कार्यक्रम, पाचव्या दिवशी खेळगडय़ांचा कार्यक्रम व दांडय़ांचे रोंबाट घातले जाते. शिमगोत्सवाच्या सहाव्या दिवशी प्रत्येक वाडय़ातील मानाप्रमाणे रोंबाट एकत्र येऊन गुलाल उधळतात. नंतर रोंबाट पुढे श्री देव क्षेत्रपालाचे दर्शन घेण्यासाठी अवसार काठीसह सीमेपर्यंत धावत जातात.

श्रींचे दर्शन घेतल्यावर भवानीचे दर्शन घेऊन रोंबाट चव्हाटय़ावर येते. त्यानंतर सायंकाळी होळी व हुडय़ावर धूळ मारण्यासाठी एकत्रित येऊन धुळवड साजरी करतात. या काळात पेटत्या शेणी (पाळीव जनावराच्या शेणापासून बनविलेल्या) मारण्याचा कार्यक्रम होतो. शेणी जाळून झाल्यानंतर कवळे जाळली जातात. (झाडाच्या फांद्यापानासह एकत्रित बांधलेली सुकी मोळी) जाळताना पेटत्या आगीतून धावण्यास भाविक आघाडीवर असतात. सहा दिवस शिमगोत्सव साजरा केल्यानंतर सातव्या दिवशी हुडा उत्सव साजरा केला जातो. श्री देवी भावईचे भाऊ आंबेगाव येथील श्री देव क्षेत्रपाल व कोलगावचा लहान भाऊ श्री देव कलेश्वर आपल्या बहिणीच्या या हुडा उत्सवात निशाणकाठी व मानकऱ्यासहित उपस्थित राहतात.

सायंकाळी देवस्थानचे मानकरी परब यांच्या निवासस्थानावरून श्री देवी भावईची पालखी निशाण काठीसह मंदिराकडे आणली जाते. तेथे विधीवत धार्मिक कार्यक्रमानंतर अवसारी प्रसाद कौलानंतर पालखी व रोंबाट हुडय़ाजवळ येते. तेथे घोडे मोडणी, वाघाची शिकार आदी परंपरेप्रमाणे होत असलेले कार्यक्रम केले जातात. पालखी हुडयाजवळ ठेवून तीन संचारी अवसारी पुरुष शंभर फुटी गगनचुंबी हुडय़ावर चढतात. हे अवसारी पुरुष हुड्यावर झराझरा चढत असताना भाविक त्यांच्या दिशेने खालून दगड फेकतात. हा दगड त्यांच्यावर बसत नाही, पण तो ज्याच्या हातून बसेल तो भक्त भाग्यवान ठरतो. अवसारी पुरुष शंभर फुटी हुडय़ावर झटपट चढत असताना त्याच्या दिशेने दगड वेगाने मारला जातो. ते पाहण्यासाठी हजारो डोळे गगनचुंबी हुडय़ाकडे टिपून राहतात. होळी सणातील या उत्सवात चाकरमानी मोठय़ा संख्येने उपस्थित असतात.

**निखाऱ्यावर चालणे आणि वाघाच्या शिकारीचा थरार विज्ञान युगातही सुरूच.....**

अवसारी संचारा (देव)वर दगडफेक करणे, कवळे जाळून त्यातून नाचणे आणि वाघाची शिकार करणे असे होळी उत्सवातील थरार विज्ञान युगातही सुरू आहेत. ते पाहण्यासाठी भाविकांची ओसंडून वाहणारी गर्दी श्रद्धेवर विश्वास ठेवणारी ठरत आहे. कुणकेरी येथील सात दिवसांच्या होळी उत्सवातील ही आगळीवेगळी प्रथा आजही सुरू आहे. कुणकेरी गावात देवी भावईचा हुडा उत्सव सर्वत्र प्रसिद्ध आहे. या सणामुळे भाविकांची भेट म्हणण्यापेक्षा दोन देव बहिणीला (श्री देवी भावईला) भेटण्यास येतात, हाही एक अचंबित करून टाकणारा प्रकार डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरतो. हुडा म्हणजे १०० फुटी सागवानी उंचच्या उंच होळी घातली जाते. तिला झाडाच्या पानांनी सजविली जाते. त्याला हुडा म्हणून संबोधिले जाते. सात दिवसांचा शिमगोत्सव या गावात थाटात साजरा केला जातो. या काळात विविध कार्यक्रम होतात.

**भाऊ-बहिणीची भेट**

कुणकेरी गावाजवळ असणाऱ्या आंबेगाव येथील श्री देव क्षेत्रपालेश्वर आणि कोलगाव येथील श्री देव कलेश्वर ही दोन देवस्थाने आहेत. कुणकेरीच्या देवी भावईच्या होळी सणातील हुडा उत्सवाला श्री देव क्षेत्रपालेश्वर, श्री देव कलेश्वर आणि श्री देवी भावईची भेट होते. श्री देवी भावईचे हे दोन भाव म्हणून ते हुडा उत्सवाला बहिणीच्या भेटीला येतात, अशी आख्यायिका आहे. बहिणीला तरंग काठीसह वाजतगाजत भेटण्यास येणाऱ्या भावांना आणण्यासाठी देवीची पालखीही नेली जाते. हा देखणा प्रसंग गावाच्या व तेथे राहणाऱ्या लोकांच्या श्रद्धेतून एकात्मता निर्माण करतो.

**कवळे व शेणी जाळणे**

शिमगोत्सव काळात रोंबाट, राधा नाचणे अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल असते. होळी सणात रोंबाटात नाचण्यासाठी खास मुंबईहून चाकरमानी गावाला येतात. त्यामुळे या सणात आनंदाची भर पडते. कुणकेरी गावात होळी सणाचा थाट औरच असतो. तो पाहण्यासाठी नातेवाईक व भाविक येतात. झाडांच्या फांद्या एकत्रित करून मोळी बांधली जाते, त्याला कवळे म्हणतात. ही कवळे शेतात जाळल्यास किडीचा प्रादुर्भाव होत नाही, तो खताचा उत्तम उपाय ठरतो. खतांची मात्रा असणाऱ्या या कवळांना जाळण्याचा होळी उत्सवातील प्रकार आगळा-वेगळा ठरतो.

**घोडे मोडणी आणि वाघाची शिकार**

रोंबाट, राधा नाचवणे, घोडे मोडणी व वाघाची शिकार किंवा अन्य प्राण्यांची सोंगे घेऊन शबय मागण्याचा प्रकार होळी उत्सवात घडतो. कुणकेरीत घोडे मोडणी हा प्रकारही आगळावेगळा ठरतो. घोडय़ाच्या पायाखाली झोपणे आणि त्यावरून घोडा जाण्याने संबंधित व्यक्तीच्या आयुष्यातील दु:खे जातात, अशी आख्यायिका आहे. घोडे मोडणीमधील विविध प्रकार घडतात. कधी काळपासून सुरू असलेली ही प्रथा आजही होळी सणात प्राधान्याने सुरू आहे.

वाघाची शिकार करण्याच्या क्षणालाही फारच महत्त्व असते. वाघाला घेऊन शिकार करण्याचे उत्सवातील एक क्षणचित्र आज वाघ किंवा घोडय़ाचे सोंग घेऊन केले जात असले तरी पूर्वी कृती केली जायची. हे शेतकरी व शेती भोवतीचे चक्रव्यूहासारखे फिरणारे सणाचे चक्र थेट पर्यावरण व निसर्ग रक्षणाचे शिक्षण देते. होळी उत्सवातील असेच क्षण कोकणातील प्रत्येक गावात वैशिष्टय़ ठेवून जाणारे आहेत. प्रत्येक गावाचे रीतिरिवाज आगळावेगळा आनंद देणारे ठरतात. त्यामुळे कुणकेरी हा एकच गाव नव्हे, तर सिंधुदुर्गात होळी सणाचे पारंपरिकता राखणारी वैशिष्टय़े महत्त्वाची ठरतात.

## गोव्याच्या सीमेवर असलेल्या वझरेतील गाडा शिमगोत्सव उत्साहात साजरा

**दोडामार्ग । वार्ताहर**




महाराष्ट्र व गोवा राज्याच्या सीमेवर असलेल्या वझरेतील होळीच्या तिर्सय़ा दिवशी होणारा गाडा उत्सव उत्साहात पार पडला. गावातील चांगल्या शक्तींनी वाईट शक्तींवर मिळविलेल्या विजयाचे प्रतिक म्हणून हा उत्सव होत असल्याचे ग्रामस्थांकडून याबाबत सागितलं जाते या उत्सवाला गोवा कर्नाटक महाराष्ट्र राज्यांतील भाविक येतात

येथील सीमेवर असणाऱ्या गावात शेकडो वर्षांपूर्वी मेषे समाजा कडून वझरेतील स्थानिकांवर अत्याचार केला जायचा. या अत्याचाराविरोधात लढणे हे स्थानिकांसाठी मोठे आव्हान होते. मात्र वझरेतील ग्रामस्थांनी त्यांचे पाहुणे, सगे-सोयरे, इतर सहकारी यांच्या मदतीने या जुलमी समाजाचा कायमचा बिमोड करण्याचे योजिले. त्यानुसार डाव आखला गेला व संधी मिळताक्षणी जुलमी समाजातील सर्वांना मारून त्यांचे मृतदेह खटारा गाडीतून गावात आणले आणि आनंदोत्सव साजरा केला. त्या विजयाचे प्रतिक म्हणून वझरेत आजही गाडा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदा हा गाडा उत्सव मोठ्या आनंदात साजरा केला. हा उत्सव पाहण्यासाठी आयी, आंबडपाल, गिरोडे, माटणे, तळेखोल व इतर गावांतून मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी उसळली होती. तसेच गोवा कर्नाटक महाराष्ट्र राज्यांतील भाविक येतात गाडा उत्सव हा विशेष लक्ष वेधून घेत असतो दिवसेंदिवस यांची प्रचिती वाढतच चालली आहे

## दाणोलीत आज श्री साटम महाराज पुण्यतिथी उत्सव !

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

दाणोली येथील प्रसिद्ध श्री साटम महाराजांचा ८७ वा पुण्यतिथी सोहळा बुधवार दि. २७ मार्च रोजी साजरा होत आहे. या पुण्यतिथी उत्सवानिमित्त साटम महाराजांच्या समाधी मंदिर आणि निवासस्थानी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या साटम महाराजांच्या दर्शनासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यासह मुंबई, गोवा, कोल्हापूर, बेळगाव परिसरातून भाविकांची अलोट गर्दी होते.





या सोहळ्यानिमित्त बुधवारी समाधी मंदिरात पहाटे ४.३० वाजता काकड आरती, सकाळी ५ वाजता अभ्यंगस्नान, सकाळी ७ वाजता झाराप येथील श्री बोभाटे बुवा यांचे कीर्तन, सकाळी ८ वाजता सावंतवाडी संस्थानचे श्रीमंत खेमसावंत भोसले यांच्याहस्ते साटम महाराज समाधी पूजन व विधीवत पाद्यपूजा त्यानंतर श्री पाटकर, कोलगाव यांचे बासरी वादन, सकाळी ९ वाजता झाराप देथील बुवा संदेश सामंत यांचे भजन, सकाळी दहा वाजता पिंगुळी येथील ह.भ.प.वासुदेव सड्वेलकर यांचे कीर्तन, दुपारी १२ वाजता महाआरती, दुपारी १२.३० वाजता राधाकृष्ण संगीत साधनाच्या संचालिका विणाताई दळवी आणि सहकारी यांचा अभंग व भक्ती गीतांचा कार्यक्रम. दुपारी १ वाजल्यापासून अखंड महाप्रसादाला प्रारंभ, दुपारी दोन वाजता कलंबिस्त येथील बुवा अंकुश सांगेलकर यांचे भजन, सायंकाळी ३ वाजता मुंबई येथील बुवा संदीप वाळके यांचे भजन, सायंकाळी ४ वाजता पुणे येथील ह.भ.प.नातूबुवा यांचे कीर्तन, सायकाळी ७ वाजता महाआरती, सायंकाळी ७.३० वाजता साटम महाराज समाधी मंदिर ट्रस्टच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, रात्री ८ वाजता सवाद्य पालखी मिरवणूकीला प्रारंभ होणार असून त्यानंतर मध्यरात्री १ वाजता देवेंद्र नाईक प्रस्तुत चेदवणकर दशावतार मंडळ, चेंदवण यांचा महिमा जगन्नाथ पुरीचा हा टिकसिनयुक्त दशावतार नाटक होणार आहे. या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सावंतवाडी संस्थानचे श्रीमंत तथा श्री समर्थ साटम महाराज समाधी मंदिर ट्रस्टचे मुख्य विश्वस्त खेम सावंत भोसले आणि दाणोली बाजारपेठवासीयांनी केले आहे.

## नेपाळमधील महापौरांची कन्या अखेर सापडली

### ओशो केंद्रात शिबिरासाठी गोव्यात आली अन् बेपत्ता झाली

**पणजी । वार्ताहर**



ओशोंच्या योग आणि ध्यानधारणा शिबिरासाठी गोव्यातून बेपत्ता झालेली नेपाळची युवती अखेर सापडली आहे. आरती हामल असे नाव असलेली ही युवती नेपाळमधील धानगाधीच्या महापौरांची कन्या असल्याचे समोर आले आहे. आरती गोपाल हामल (३६, रा. नेपाळ) असे या युवतीचे नाव आहे. आरती मंगळवारी (दि.२६) मांद्रे येथील एका रिसॉर्टमधून बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या नातेवाईकांनी दाखल केली होती. आरती ओशोंच्या योग आणि ध्यानधारणा शिबिरासाठी गोव्यात आली होती.

सोमवारपासून तिच्याशी संपर्क होत नसल्याची तक्रार तिच्या कुटुंबियांनी मांद्रे पोलिसांत दाखल केली होती. आश्वे-मांद्रे येथे ती शेवटची दिसली होती, असे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.

दरम्यान, आरती हामल मंगळवारी रात्री शिवोली येथे तिच्या मैत्रिणीसोबत आढळून आली. पेडण्यातील ओशो केंद्रात ती २५ मार्च रोजी ध्यानधारणा शिबिरासाठी आली होती. बाहेर पडल्यानंतर तिने मोबाईल केंद्रातच ठेवल्याने तिच्याशी संपर्क होऊ शकत नव्हता, त्यामुळे चिंतेत असलेल्या कुटुंबियांनी मांद्रे पोलिसांत तक्रार दाखल केली.

## सिंधुदुर्गचा सुपुत्र हरियाणा राज्यात उच्च अधिकारीपदी विराजमान!

**देवगड । पांडूशेठ साटम**

देवगड तालुक्यातील महाळूंगे येथील ओंकार हरिकृष्ण राणे याने हरियाणा लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत उत्तीर्ण होऊन त्याची वयाच्या २७ व्या वर्षी हरियाणा राज्यात उद्यान विकास अधिकारी पदी निवड झाली आहे. जिद्द चिकाटी व मेहनतीमुळे त्याने हे यश संपादन केले आहे. सिंधुदुर्ग जिल्यातून त्याची ही एकमेव निवड आहे. ओंकार राणे हे शेतकरी कुटूंबातील असून त्याचे प्राथमिक शिक्षण जि.प.महाळुंगे शाळेत झाले. त्यानंतर पुढील शिक्षण त्याने फणसगाव व कासार्डे येथे घेतले. त्यास लहानपणापासून शेतीची आवड असल्याने सन २०१८मध्ये कुडाळ तालुक्यातील मुळदे येथील उद्यान विद्या महाविद्यालयात कृषी विषयात पदवी प्राप्त केली.तसेच सन २०२१ मध्ये लुदीयांना येथील पंजाब कृषी विशवविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर सन २०२३ मध्ये हरियाणा राज्यातील चंदिगड- पंचकुला येथे हरियाणा लोकसेवा आयोगाची परिक्षा दिली व जानेवारी २०२४ मध्ये उत्तीर्ण होऊन गुणवत्तेवर नुसार त्याची हरियाणा येथे उद्यान विकासअधिकारी (हॉर्टीकल्चर



डेव्हलपमेंट ऑफिसर) पदी निवड झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून त्याची हि एकमेव निवड आहे. सध्या त्याचे हरियाणात प्रशासकीय कारभाराबाबत प्रशिक्षण सुरु आहे. त्यास चुलते दिनेश राणे यांची प्रेरणा व मार्गदर्शन लाभले. ओंकार याने आपणास मिळालेले यश हे जिद्द, चिकाटी व मेहनतीने तसेच आई-वडिलांच्या आशीर्वादाने मिळाले असल्याचे सांगितले. त्याचे आई-वडील शेतकरी आहेत. खडतर परिश्रमातून यश मिळवायचे असेल तर कुठल्याही परिस्थितीवर मात करून यशाचे शिखर गाठता येते.अशा शेतकरी कुटूंबातील ओंकार राणे यांने मिळविलेले यश हे इतर तरुणांना प्रेरणा देणारे आहे. आपल्या मुलाने प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण झाले आहे. असे मत त्याच्या वडिलांनी सांगितले. त्याच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

## शिवोलीत झाडांची कत्तल आमदार लोबोंना नोटीस

**पणजी । प्रतिनिधी**

शिवोली येथे रस्ता रुंदीकरणासाठी कोणत्याही खात्याची परवानगी न घेता दीडशे वर्षाहून जुन्या झाडांची कत्तल केल्याप्रकरणी दाखल जनहित याचिकेत मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांना प्रतिवादी केले आहे. या प्रकरणात लोबो यांना नोटीस बजावून प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा आदेश न्यायालयाने दिला असून पुढील सुनावणी २ एप्रिल रोजी ठेवली आहे.

## दीड महिन्याच्या मुलीला बेवारस टाकून पळालेल्या मातेला अटक

**मडगाव । वार्ताहर**

बोर्डा-फातोर्डा परिसरातील बुधवारी सकाळी दीड महिन्याचे बाळ प्लास्टिक पिशवीत बेवारस टाकून दिल्याचे आढळून आल्यानंतर पोलिसांनी लगेच घटनास्थळी धाव घेतली. बाळाला तत्काळ उचलून उपचारासाठी त्यांनी इस्पितळात भरती केले. त्यानंतर काही काळात त्याच्या आईला शोधून गजाआड करण्यात आले. ही संशयित महिला महाराष्ट्रातील चंदगड येथील आहे. कुटुंबावर मुलाचे ओझे होत होते,



त्यामुळे तिने असे कृत्य केल्याचे चौकशीत म्हटले आहे.बुधवारी सकाळी बोर्डा फातोर्डा येथे दीड वर्षाचे बाळ बेवारस टाकण्यात आलेले असल्याची माहिती फातोर्डा पोलिसांना मिळाली होती. फातोर्डा पोलिसांसह पिंक फोर्सच्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. एका घराच्या मागील बाजूला हिरव्या रंगाच्या प्लास्टिकच्या पिशवीत भरून साधारण दीड महिन्याच्या बाळाला टाकण्यात आल्याचे त्यांना आढळून आले. पिंक फोर्समधील महिला पोलिसांनी तत्काळ मुलाला वैद्यकीय तपासणीसाठी दक्षिण गोवा जिल्हा इस्पितळात दाखल केले. फातोर्डा पोलिसांकडून करण्यात आलेल्या चौकशीत हे मूल त्याच ठिकाणी जवळ राहत असलेल्या एका कुटुंबीयांचे असल्याचे समजले. पोलिसांच्या चौकशीत घरातील व्यक्तींकडून विसंगत माहिती देण्यात येऊ लागली. पोलिसांनी सखोल चौकशी केल्यानंतर बाळाच्या आईने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी लगेच तिला ताब्यात घेतले.

## ऐन शिमग्यात मासेमारीवर संक्रांत; मासळी गायब

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

ऐन शिमग्यात मासेमारीवर संक्रांत आली आहे. मागील दोन महिन्यांपासून मासेमारी व्यवसाय कोलमडून गेलेला असताना शिमग्याच्या सणात मच्छीमारांच्या जाळ्यातून अनेक मासे गायब झाले आहेत. मच्छीमारांना मासळी मिळत नसल्याने उपलब्ध मासळीचे दर गगनाला भिडल्याने खवय्यांची पंचाईत झाली आहे. समुद्रात रोजच्या होणार्या खर्चाइतकीही मासळी मिळत नसल्याने नौका मालक आर्थिकदृष्ट्या फारच अडचणीत आला आहे.

रत्नागिरी जिल्ह्याला १६७ कि.मी.चा समुद्र किनारा लाभला असून, २ हजार ५२० सागरी मासेमारी नौका आहेत. यातील २ हजार ७४ यांत्रिकी नौका असून, २७५ पर्ससीन नेट मच्छिमार नौका आहेत. यातील ८० ते ९० टक्क नौका मालकांची आर्थिक स्थिती मासळी रिपोर्ट नसल्याने कर्जबाजारीपणाची झाली आहे. समुद्रातील वादळी वार्यामुळे माशांचे होणारे स्थलांतर आदी कारणांमुळे स्थानिक मच्छिमार नौकांना मासळी मिळत नाही. जी काही किरकोळ प्रमाणात मासळी मिळत आहे त्याचे दर वधारले आहेत. पापलेट मासा दुर्मिळच



झाला आहे. याचा परिणाम म्हणून मार्केटमधील मासळीचे दर वाढले आहेत.

रत्नागिरी जिल्ह्याच्या समुद्रात मासा न मिळण्याची स्थिती गेल्या दोन महिन्यांपासून आहे तशीच आहे. फिशींगसह पर्ससीन नेट नौकांचीसुद्धा हीच अवस्था आहे. पर्ससीन नेट नौकांना आठवडाभर मासेमारी करायची झाली तर इंधन, पगार व खलाशांचा इतर किराणा माल आणि आठवड्याच्या पगाराची रक्कम धरून ४ ते ५ लाख रुपये खर्च येतो. परंतु या आठवडाभरात केवळ ४० ते ५० हजार रुपयांचीच मासळी मिळत असल्याचे मच्छिमारांनी सांगितले. याचा परिणाम म्हणून गेल्या पंधरा दिवसांपासून नौका बंदरातच उभ्या ठेवल्या जात आहेत. जो काही मागील खर्च झाला आहे तो नौका मालकांच्या अंगावर पडत असून, ते कर्जाच्या विळख्यात सापडले आहेत.

मिरकरवाडा बंदरावर दोन महिन्यांपूर्वी ३५० ते ४५० रुपये किलोने मिळणार्या सुरमईचा दर रविवारी ९०० रुपये प्रतिकिलो होता. सरंगा ३०० रुपये किलो दराने मिळत होता तो ७०० रुपये किलो दराने विकला जात होता. सौंदाळा १०० रुपये किलो दराने मिळत होता त्याचे दर २८० रुपये किलो आहेत. बांगडा ८० ते ९० रुपये किलो दराने होता तो रविवारी १३० रुपये किलो दराने होता. जिल्ह्याच्या समुद्रातील पापलेट मात्र गायबच होते. जे काही पापलेट विकले जात होते ते पॅकिंगचे किंवा फ्रोझनचे होते. या पॅकींग पापलेटचा दरही ९०० ते १००० रुपये किलो इतका होता.